वर्ष : सोळावे
ऑगस्ट २०२४
अंक : आठवा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

आदित्य दवणे यांचा हा
पहिलाच कवितासंग्रह.
माणसात लपलेल्या हिंस्रतेचे
अनेकविध पदर उलगडून दाखवणारा,
त्याच्यातल्या माणूसपणाचेही
दर्शन घडवणारा -



आज परिवर्तनाच्या चळवळी कुंठित झाल्याचे चित्र दिसते.
अशाच शोधयात्रेत राजीव साने
केवळ चिकित्सा करून थांबले नाहीत,
तर स्वतंत्र नीतिशास्त्राच्या उभारणीची गरज त्यांनी ओळखली.
भविष्यातील आवश्यक अशा विचारमंथनाची
एक नवी पायवाटच साने यांनी घालून दिली आहे.
त्या दिशेने जाणाऱ्यांना
मार्गदर्शक ठरेल असे पुस्तक.



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक आठवा
१५ ऑगस्ट २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी विशेष
  *श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार* / ९
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *नात्यास नाव आपुल्या...*
  – आसावरी देशपांडे जोशी / १५
- गाऊ त्यांना आरती
  *अटलजी* / १९
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / २५
- असे जन्मले पुस्तक!
  *गोंदणखुणा* – डॉ. प्रिया निघोजकर / २९
- आठवणींच्या खिडकीतून
  *घाट घातला - घट फुटला*
  – श्रीराम रानडे / ३३
- क... कवितेचा - अर्चना भालेराव / ३७
- उद्‌गार
  *युद्धानंतर...* - दिनकर गांगल / ३९
- श्रद्धांजली - *फादर फ्रान्सिस दिब्रिटो*
  - आनंद हर्डीकर / ४१
- राजहंसी पार / ४७
- वाचकांच्या मनातलं... / ४९

---

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



आपल्याही नकळत आपल्या रोजच्या जगण्याचा भाग झालेल्या टीव्ही मालिका. त्याबद्दल स्वत:ला आणि प्रेक्षकांना पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं देणारं, ‘मालिका’ या विषयावर मार्गदर्शन करणारं पुस्तक...

### टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!

मुग्धा गोडबोले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)






आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोहक मुखवट्याआडचा भेसूर चेहरा दाखवणारे-
सायबर गुन्ह्यांबाबत सर्वांना सतर्क बनवणारे-

### सायबर अ‍ॅटॅक

डॉ. संजय तुंगार । सुधीर साबळे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*खरे तर कुठलीही कला ही अभिव्यक्तीचे माध्यम असते. मात्र कला सादर करण्यासाठी कलाकारांना सोयीसुविधांची गरज असते. पण अलीकडे याकडे दुर्लक्ष होताना दिसते. 'अडलंय का?' या नाटकाच्या निमित्ताने आज यावर बोलावेसे वाटले, इतकेच.*

नमस्कार वाचकहो,

काही दिवसांपूर्वी म्हणजे १४ जुलै २०२४ला 'नाटक कंपनी' या संस्थेतर्फे 'ग्योथे-इन्स्टिटयुट मॅक्स म्युलर भवन पुणे' आणि 'कॉन्सुलेट जनरल ऑफ स्वित्झर्लंड इन मुंबई' यांच्या सहयोगाने सादर झालेले 'अडलंय का?' हे नाटक बघितले. तो या नाटकाचा सुवर्ण महोत्सवी व शेवटचा प्रयोग होता. कलेसाठी कला की जीवनासाठी कला, हा महाराष्ट्रातला जुना वाद. या वादाची आठवण करून देणारे हे नाटक वाटले आणि आजच्या गतिमान, यांत्रिकी युगात आज नाटकाची, विशेषकरून रंगमंचावर प्रस्तुत होणाऱ्या नाटकाची गरज कशी आहे; याची जाणीव करून देणारे हे नाटक आहे, म्हणूनच या नाटकाबद्दल थोडे सविस्तर.

तसे पाहायला गेले, तर आपल्या आजूबाजूला आपल्याला अनेक प्रकारची माणसे भेटत असतात. त्यांतली काही अशी असतात की, जी नाट्यगृहात जाऊन नाटक बघत नाहीत; पण सिनेमागृहात जाऊन अगदी फालतू सिनेमेही बघतात. अर्थात त्यांच्या दृष्टीने ते सिनेमे चांगले असतीलही. भाषेचा बाऊ करून नाटकांना विशेषत: मराठी नाटकांना न जाणारा वर्ग तर दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यांचे म्हणणेच असते, 'अरे, ती नाटकातली भाषा ना, ती अगदी डोक्यावरून जाते आमच्या. भाषाच समजली नाही, तर नाटक कसं समजणार?' पण वस्तुस्थिती अशी की, हीच माणसे 'इंग्रजी सिनेमे, इंग्रजी गाणी आम्ही ऐकतो' अशा बढाया मारत असतात. त्यांचा अर्थ त्यांना खरेच कळत असतो? आपली मातृभाषा मराठी आहे, याचा विसर तर अलीकडे सर्वच स्तरांतील मराठी बांधवांना पडलेला दिसतो. आणि काही लोक तर एखाद्या खऱ्या कलाकाराला सल्ला देतात, 'तुझी आवड मुलांवर लादू नको. तुला जे काही करायचं होतं, ते तू केलंस; आता मुलांना चांगल्या व्यवसायात जाऊ दे.' खरे तर एखाद्या हाडाच्या कलाकारासमोर असे

बोलणे आणि नाटकांना कमी लेखणे, हे सर्वथा चूकच आहे.

'अडलंय का?' या नाटकातील अल्ब्रेश्ट हा एका नाट्यगृहाशी संबंधित कलाकार असतो. त्याला कुणकुण लागते की, नाट्यगृहाच्या देखभाल खर्चात कपात होणार आणि हळूहळू नाट्यगृह बंद पाडून त्या जागी एखादा मॉल उभा राहणार. अल्ब्रेश्ट हा हाडाचा नाट्य कलाकार; त्यामुळे ही बातमी समजल्यावर तो हा रिपोर्ट ज्या व्यवस्थापन कंपनीने बनवला आहे, तिचे नाव शोधतो. त्या कंपनीच्या संबंधित व्यक्तीशी बोलून तिची मते बदलावीत, असा विचार करतो. त्यासाठी बरीच तयारीदेखील करतो; पण समोर येते एक २० वर्षांची तरुणी. तिला 'नाटक' या विषयात अजिबात रस नसतो. तिच्याशी संवादाला सुरुवात झाल्यावर त्याच्या लक्षात येते की, केवळ पैशांवर प्रेम असलेल्या व्यक्तीला त्याला साहित्याचे जीवनातील स्थान, त्याचे सौंदर्य उलगडून दाखवावे लागणार आहे. हे काम त्याच्या अपेक्षेपेक्षाही खूपच अवघड असते. कारण आजच्या यंत्रयुगात वावरणाऱ्या आणि जवळजवळ एखाद्या यंत्रमानवासारखे आयुष्य जगणाऱ्या व्यक्तीचे मनपरिवर्तन त्याला करायचे असते. त्यासाठी त्या नाट्यदर्दीने आखलेल्या वेगवेगळ्या योजना आणि त्याला तितकेच सक्षम उत्तर देणारी कंपनीतील ती मुलगी यांची जुगलबंदी या नाटकात आपल्याला पाहायला मिळते.

चार्ल्स लेविन्स्की यांनी लिहिलेले, शौनक चांदोरकर यांनी अनुवादित केलेले आणि निपुण धर्माधिकारी यांनी दिग्दर्शित केलेले 'अडलंय का?' हे नाटक आहे. या नाटकात दोनच पात्रे आहेत, हे संवादप्रधान नाटक आहे. असे असले, तरी त्यामध्ये एक प्रकारचा वेग आहे. रंगमंचावर सतत काहीतरी घडत राहते. ही पात्रे आपल्याशी बोलत आहेत, असे प्रेक्षकांना वाटते. काही वेळा त्यांना अंतर्मुख होण्यास भाग पाडतात. नाटक म्हणजे काय? ते का बघावे? ते कसे बघावे? रोजच्या आयुष्यात नाटकावाचून एखाद्याचे काही अडते का? अडत असेल, तर खरेच अडायला हवे की नको? ज्यांचे अडते, ते कोण? सर्वसामान्य व्यक्तीला पडणाऱ्या अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या नाटकातून निश्चितच मिळतील.

खरे तर, नाटक म्हटले की, त्याचे नेपथ्य आलेच. पण या नाटकात कुठलेही स्थिर म्हणता येईल, असे नेपथ्य नाही. विशेष म्हणजे या नाटकातील दोन पात्रेच प्रसंगानुरूप नेपथ्य मांडत असतात, बदलत असतात. अशा प्रकारची नेपथ्ययोजना विरळाच म्हणावी लागेल. याचे श्रेय नेपथ्यकार प्रदीप मुळ्ये आणि दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी यांना द्यावे लागेल.

आणि आता या नाटकातील कलाकारद्वयीबद्दल. अतुल पेठे व पर्ण पेठे ही बापलेकीची जोडी आपल्याला नाटकात भेटते. खरे तर, अतुल पेठे यांनी आपली हयातच रंगमंचावर घालवली, असे म्हटले तर वावगे ठरू नये. त्यामुळे त्यांना

असणारी नाटकाची ओढ आणि ते टिकून राहावे, यासाठीची धडपड जणू त्यांनी अल्ब्रेश्ट या पात्राच्या माध्यमातून सर्वांसमोर मांडली आहे. ते पात्र अतुल पेठे खरोखर जगले आहेत, असे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. त्यांची संवादफेक, प्रत्येक प्रसंगात रंगमंचावरच्या त्यांच्या वावरात जाणवणारी त्यांची ऊर्जा खरेच थक्क करणारी आहे. त्याच दिवशी त्यांचा साठावा वाढदिवस होता, हे प्रयोग संपल्यावर कळले. मग तर 'अवघे साठच की वयमान' अशीच सगळ्यांची अवस्था झाली. पर्ण पेठेने 'पॉला' ही कॉर्पोरेट कंपनीमध्ये काम करणारी कर्मचारी साकारली आहे. आजच्या युगात कॉर्पोरेट जगतात कर्मचारी सतत कपातीच्या छायेत वावरत असतात, यावरही हे नाटक भाष्य करते. तिने ती व्यक्तिरेखा जिवंत केली आहे. सुरुवातीचे तिचे नाटकाबद्दलचे मत, बेफिकिरीचे बोलणे; त्यासाठी अल्ब्रेश्टवर कुरघोडी करण्यासाठी युक्त्या शोधून त्या अमलात आणणे, प्रसंगी त्याला पेचात पाडणे असे प्रसंग तिने छान रंगवले आहेत. नंतर 'मलाही तो नाटकाचा किडा चावलाय' असे म्हणत अल्ब्रेश्टच्या मताशी सहमत होणे, इथपर्यंतची आंदोलने तिने उत्तम प्रकारे साकार केली आहेत.

नाटकावर प्रेम असलेल्या सर्वांनी हे नाटक जरूर पाहायला हवे. ज्यांना नाटक म्हणजे काय, असा प्रश्न पडतो, त्यांनी तर हे नाटक आवर्जून पाहावे; अर्थात आता ते उपलब्ध कसे होणार हा प्रश्न आहेच. जर दिग्दर्शकाने आणि कलाकारांनी ठरवले, तर डिजिटल माध्यमातून ते बघता येईल.

वाचकहो, खरे तर कुठलीही कला ही अभिव्यक्तीचे माध्यम असते. मग ती चित्रकला असो, नाटक-सिनेमा असो, एखादे पुस्तक असो; त्यातून समाजाचे प्रबोधन होते, मनोरंजन होते. प्रसंगी हीच कला अनेकांना प्रेरणा देते. काही वेळा सत्ताधाऱ्यांवर प्रहारही करते आणि समाजातील विकृतींची जाणीवही करून देते. मात्र या कला सादर करण्यासाठी कलाकारांना सोयीसुविधांची गरज असते. पुस्तकांसाठी दालने, ग्रंथप्रदर्शने; क्रीडापटूंसाठी क्रीडांगणे, अभिनय क्षेत्रातील कलाकारांसाठी नाट्यगृहे-सिनेमागृहे. यादी पुष्कळ मोठी आहे. शहराच्या त्या त्या भागात अशा सोयी प्रशासनाने पुरवणे गरजेचे आहे; पण अलीकडे याकडे दुर्लक्ष होताना दिसते. ठिकठिकाणच्या नाट्यगृहांची अवस्था बिकट झाली आहे. त्यांच्या देखभालीवर होणाऱ्या खर्चात कपात करण्यात येत आहे. हे नाटक जर्मन भाषेतील असले, तरी त्यात मांडलेला प्रश्न हा जगाच्या पाठीवरच्या कुठल्याही शहरातला आजचा प्रश्न आहे, असे जाणवल्यावाचून राहत नाही.

'अडलंय का?' या नाटकाच्या निमित्ताने आज यावर बोलावेसे वाटले, इतकेच.

***आरती घारे,*** कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

### मेड इन चायना

गिरीश कुबेर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

एका सच्च्या समाजवाद्याचं उदास, चिंतनशील स्वगत.
अनेक अंतर्विरोधांनी ग्रासलेलं भारताचं बहुआयामी
समाजजीवन चंद्रशेखरांनी पुस्तकात सजीव केलंय.
पुस्तकात चंद्रशेखर म्हणतात,
'राजकारण सत्यावर चालत नाही हेच खरं.'
**- अंबरीश मिश्र**

### चंद्रशेखर : जसं जगलो तसं

अनुवाद : अंबरीश मिश्र

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)







'कितीही अडचणी, वाईट प्रसंग आले, तरी डरायचं नाही'
असा संदेश देणारी वेलवर्गीय वनस्पती - 'दौशाड'!
तिचाच आदर्श घेऊन माणदेशातील माणसं हिमतीनं
जगत असतात. त्यांची कहाणी सांगणारं...

### दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी विशेष

## श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार

*'डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृती-संशोधन केंद्र' आणि 'राजहंस प्रकाशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाराष्ट्राच्या वैचारिक समृद्धीसाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या विचारवंतांना, ज्ञानोपासकांना किंवा अभ्यासकांना दरवर्षी 'श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार' दिला जातो. यंदाचे हे सहावे वर्ष आहे. मागील पाच वर्षांत दिलेल्या 'श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार' मानकऱ्यांबद्दलची ही संक्षिप्त माहिती.*

### 'श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कारा'चे मानकरी

#### न्या. नरेन्द्र चपळगावकर (२०१९)



मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आणि वैचारिक लेखक. कायदा, इतिहास, समाजव्यवस्था, भाषा आणि साहित्य यांविषयी विपुल लेखन केले आहे. 'आधुनिक तसेच ब्रिटिशकालीन भारताचा इतिहास आणि त्या काळातले भारतीय महानायक' या विषयावर सत्यान्वेषी लेखन करणारे व्यासंगी लेखक म्हणून महाराष्ट्राला त्यांचा परिचय आहे.

#### शेषराव मोरे (२०२०)



महाराष्ट्राचे विचारविश्व समृद्ध करणारे लेखक. भारतावरील इस्लाम धर्माच्या प्रभावाचा त्यांचा विशेष अभ्यास आहे. मुस्लीम मनाचा, मुस्लीम तत्त्वज्ञानाचा अत्यंत सखोल अभ्यास शेषरावांनी केला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हाही त्यांच्या लेखनाचा महत्त्वाचा विषय आहे. सावरकरांचा बुद्धिवाद, समाजकारण, हिंदुत्ववाद, समाजक्रांती यांविषयी चिकित्सक लेखन त्यांनी केले आहे. 'स्वतंत्र बुद्धीने परखड लेखन करणारे विचारवंत' अशी त्यांची ओळख आहे.

डॉ. श्रीकांत बहुलकर (२०२१)



संस्कृत, भारतविद्या आणि बौद्ध तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्वान. बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञानाचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. त्यांनी ‘सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा’च्या ‘पाली आणि बौद्ध अध्ययन विभागा’त या भाषेतल्या ग्रंथांचे अध्यापन केले आणि या ग्रंथांचा अभ्यास करणारी पिढी महाराष्ट्रात तयार व्हावी, म्हणून ‘बौद्ध अध्ययन’ या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात पुढाकारही घेतला.

अरुण खोपकर (२०२२)



लेखक, चित्रपट दिग्दर्शक आणि अभ्यासक, लघुचित्रपट निर्माते. बहुभाषा कोविद असणारे अरुण खोपकर हे कलेच्या क्षेत्रातले ज्येष्ठ विचारवंत, लेखक आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कला विमर्शक म्हणून ओळखले जातात. ‘चित्रपटविषयक सौंदर्यशास्त्र’ या विषयावर अतिशय मूलगामी चिंतन आणि विपुल लेखन त्यांनी केले आहे. संगीत, चित्रकला, साहित्य, वास्तुशास्त्र अशा अनेक विषयांवरची चित्रपटनिर्मिती करताना, आणि या विषयावर लेखन करतानाही कला आणि सौंदर्य यांच्यातल्या परस्पर संबंधांविषयीची अंतर्दृष्टी देण्यावर त्यांचा भर राहिला आहे.

सत्यशील देशपांडे (२०२३)



सर्जनशील गायक, संगीतकार आणि लेखक. भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात आजवर घडत गेलेल्या बदलांचा वेध संगीतातून आणि साहित्यातून घेणारा हा कलावंत आहे. भारतीय संगीत परंपरेशी असलेले नाते कायम राखत, स्वत:ची प्रतिभा आणि प्रयोगशीलता व संगीतविषयक विचार ताजा ठेवण्याचे कसब त्यांच्या गायनात जसे दिसते, तसे ते त्यांच्या लेखनातही उमटताना दिसते. समजूत, संवेदना, रसिकता आणि बुद्धी यांचा मेळ घालत त्यांनी संगीतविषयक लेखन केले आहे.

## रंग माझा वेगळा...



राजीव साने

*या वर्षी 'श्रीगमा स्मृतिसन्मान पुरस्कार' विविध विद्याशाखांचे अभ्यासक व व्यासंगी लेखक राजीव साने यांना प्रदान करण्यात आला.*

*राजहंस प्रकाशन परिवारातर्फे राजीव साने यांचे हार्दिक अभिनंदन!*

*या निमित्ताने रविवार दि. २८ जुलै २०२४ रोजी डॉ. अजय ब्रह्मनाळकर यांनी 'सकाळ' या दैनिकात लिहिलेला लेख पुन:प्रकाशित करीत आहोत.*

विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेले राजीव साने स्वेच्छेने विद्यापीठीय चौकटीत अडकले नाहीत. आयुष्यभर फ्री लान्स आंतरविद्याशाखीय अभ्यासक राहिले. आपल्या विचारात कुंठितता येऊ देणे उपयोगाचे नाही; वैचारिक परंपरा जाणून घेतल्या पाहिजेत; परंतु, आपले तत्त्वज्ञान घडवले आणि आपल्यापुढे मांडले, म्हणूनच तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक प्रा. मे. पुं. रेगे यांनी 'राजीव फिलॉसॉफी करतो' असे प्रशस्तिपत्र त्यांना दिले होते.

राजीव साने यांचा पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास आहे. पन्नास वर्षांपूर्वी सर्वच विचारकांना मार्क्सवादाची गुटी पाजली जात असे. साने यांनाही ती बक्कळ मिळाली होती. ते त्या गटात काही काळ सक्रियदेखील होते. परंतु आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची कालसुसंगत उत्तरे शोधायची तर आपली विचारचौकटही कालसुसंगत असायला हवी, हा शोध त्यांना लवकरच लागला. त्यानंतर कुठल्याही गटात सामील न राहता, स्वत:ची प्रज्ञा आणि प्रतिभा यांच्या साहाय्याने तात्त्विक, सामाजिक, आर्थिक प्रश्नांचा ते मागोवा घेऊ लागले. 'साप्ताहिक सकाळ'मधून १९९५मध्ये 'मर्मजिज्ञासा' आणि १९९६मध्ये 'युगांतर' या लेखमालेतून ते आपल्यासमोर आले. पुढे 'युगांतर', 'नवपार्थहृद्गत', 'गल्लत गफलत गहजब' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली. या तिन्ही पुस्तकांना राज्यपुरस्कार मिळाले. नुकतेच 'स्फूर्तिवादी नीतिशास्त्र' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

साने मानवी स्वातंत्र्याला सर्वोच्च मूल्य मानतात; आणि अहिंसा, समृद्धी व न्याय ही मूल्ये स्वातंत्र्याला अनुक्रमे समावेशकता, अवकाश आणि उत्तरदायित्व

प्रदान करतात, असे त्यांचे म्हणणे. वास्तविक समता या मान्यताप्राप्त मूल्याचे बाळकडू साने यांना मिळाले होते. परंतु शासक आणि शासित हे कधीही समान असू शकत नाहीत. दमनकारी यंत्रणेशिवाय समता व्यवहारात शक्य होत नाही आणि समता हे मूल्य स्वातंत्र्य या मूल्याच्या मुळावरच येते, हे पेच त्यांच्या लक्षात आले. समृद्धीला मूल्य म्हणून प्रस्थापित केल्याशिवाय ना अहिंसा व्यवहारात शक्य आहे, ना न्याय; ही तर्कसंगत गोष्टदेखील त्यांच्या लक्षात आली. ते तशी मांडणी करू लागले. ती करताना मार्क्सवादाची झूल त्यांना अंगावरून उतरवावी लागली; त्यासाठी स्वत:शीही झगडावे लागले. हा झगडा वेदनादायक असतो, असे त्यांनीच एके ठिकाणी म्हटले आहे. परंतु त्या वेदना त्यांनी सोसल्या आणि स्वत:स जे पटते, त्याची मांडणी करण्याची स्वतंत्र वाटचाल चालू ठेवली.

**लोकाभिमुख तत्त्वज्ञान**

'जी.एं.नी तत्त्वज्ञानाला देहधारी केले,' असे ग. प्र. प्रधान यांनी म्हटले होते. राजीव साने यांनी तत्त्वज्ञान लोकाभिमुख केले, असे म्हणता येईल. घटपटादी खटपटीत अडकलेले तत्त्वज्ञान साने यांनी आम जनतेसाठी मोकळे केले. फुटका तळ असलेला हौद भरण्याची गणिते बऱ्याच जणांना लहानपणी अप्रस्तुत वाटतात; तसेच तत्त्वज्ञान अप्रस्तुत वाटते. परंतु सानेंनी रोजच्या जीवनातील प्रश्न घेतले, त्यांत दडलेल्या तात्त्विक मुद्द्यांवर खुसखुशीत शैलीत लिखाण केले. त्यामुळे दूरचे भासणारे तत्त्वज्ञान वाचकांच्या जवळ गेले. सानेंच्या मते 'विचारव्यूहांची शास्त्रीय परिभाषेत मांडणी करणे सर्वांना जरी जमले नाही; तरी अनेकांच्या डोक्यात विचारव्यूह असतात, त्याआधारे आपल्या परीने ते गुंतागुंतीच्या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करत असतात.' आधुनिक काळात विचारव्यूह कलह वाढल्याने प्रश्नांची उकल साधणे सामान्यांसाठी दुष्कर होऊन जाते. परंतु साने आपल्या लेखनातून वाचकांच्या विचारव्यूहांतील कलह कमी करत नेतात. ते करण्याची त्यांची शैली खुसखुशीत आहे. त्यांच्या तात्त्विक लेखनालाही लोकप्रियता मिळाली, हे त्यांचे मोठेच यश आहे. मात्र शैलीचा खुमासदारपणा राखताना मांडणीतील काटेकोरपणा, तर्ककठोरता ते कुठेही सोडत नाहीत. त्यामुळे त्यांचे लेखन वाचनीय झाले, तरी आवश्यक ती गंभीरता राखते. शब्दांना अनेक छटा चिकटलेल्या असतात. आपले म्हणणे नेमके आणि टोकदार करण्यासाठी आपण वापरत आहोत, तो शब्द कोणत्या अर्थाने घ्यायचा किंवा कोणत्या अर्थाने घ्यायचा नाही, असे म्हणताना साने जास्तच किचकटपणा करतात, असा त्यांच्यावर आक्षेप घेतला जातो. परंतु, नैसर्गिक या शब्दाचे, 'भौतिकदृष्ट्या संतुलित, स्वभावदत्त, अकृत्रिम आणि अविकृत असे

चार वेगवेगळे अर्थ असताना, त्यांतील नेमका कुठला अभिप्रेत आहे ते स्पष्ट न करता वाद घातला, की युक्तिवाद ‘स्क्यू’ होतात आणि त्यातून निष्पन्न काहीच होत नाही, हे त्यांचे म्हणणे कोणालाही पटावे असेच आहे. नीती-रितीची गुंफण समजावताना ते म्हणतात, ‘युद्ध जिंकण्यासाठी केल्या जाणाऱ्या व्यूहरचनेला ‘रणनीती’ म्हटले जाते ते चूक आहे.. ती ‘रणरीती’ आहे. ‘रेडक्रॉस’च्या लोकांवर किंवा नागरी वस्तीवर दोन्ही पक्षांनी हल्ले करायचे नाहीत, ही रणनीती आहे.’

**प्रगती-उन्नती यांतील नाते**

नीती-रिती यांतील गल्लत समजली, की आपण बरेच निरर्थक वाद घालत होतो, हे कळते आणि आपल्या डोक्यात लख्ख प्रकाश पडल्याचा फील येतो. नीती-रिती, भोक्ता स्रष्टा, प्रगती-उन्नती अशा अनेक द्वंद्वात्मक जोड्यांची त्यांनी उकल करून दाखवलेली आहे. प्रगती (भौतिक) आणि उन्नती (नैतिक) यांतील नाते उलगडताना ते चक्क ‘क्ष’ आणि ‘य’ अक्षांचा काटकोन वापरतात. त्याने प्रगती आणि उन्नती यांचे नाते चटकन आपल्या डोळ्यांसमोर येते. प्रगती झाली की उन्नती आपोआप होणार नाही हे कळते; परंतु प्रगती झाल्याशिवाय उन्नतीसाठी अवकाश खुला होणार नाही, हेही उमगते. साने यांनी हाताळलेले विषय आपल्या आयुष्याशी निगडित असतात; त्यांत दडलेले तात्त्विक मुद्दे उलगडण्याची त्यांची पद्धत अनोखी असते; त्यामुळे, साने यांचे लेखन तत्त्वज्ञानाचा अभ्यास नसलेल्यांनादेखील आपलेसे वाटते. ‘नवपार्थहृद्गत : एक आधुनिकतावादी गीताचिंतन’ या भगवद्गीतेवरील टीकाग्रंथात नवा पार्थ हा आधुनिक काळातील जाणिवांनिशी भगवान श्रीकृष्णांशी संवाद साधतो आहे, अशी कल्पना केलेली आहे. ग्रंथात मूळ गीतावचन देऊन नवपार्थाने त्याच्या तत्त्वदृष्टीतून त्यावर दिलेला अनुसाद, आक्षेप घेणारा प्रतिसाद आणि लेखकाचा स्वयंसाद अशा वृत्तबद्ध पद्यरचना केलेल्या आहेत. संक्षेपाने गद्य निरुपणदेखील केले आहे. या ग्रंथाचे स्वागत गीता शिरोधार्य मानणाऱ्यांनीदेखील केले, हे साने यांचे अपूर्व यश आहे.

(कै.) रा. चिं. ढेरे यांनी विद्यापीठीय चौकटीच्या बाहेर राहून आयुष्यभर संशोधन केले. त्यांच्या नावाने चालणाऱ्या ट्रस्टतर्फे आणि सर्वच विचारसरणींविषयी मोकळी, उदार दृष्टी बाळगणाऱ्या श्री. ग. माजगावकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार राजीव साने यांच्यासारख्या ‘रंग माझा वेगळा’ असलेल्या तत्त्वज्ञाला मिळतो आहे, यात मोठे औचित्य आहे. योग्य व्यक्तीला योग्य पुरस्कार मिळणे ही गोष्ट दुर्मीळ. हा पुरस्कार तसा असल्याने आनंद देणारा आहे.

***डॉ. अजय ब्रह्मनाळकर***

## ‘राजहंसी’ विविधा




राजीव साने यांच्या पुस्तकांमधून अन् इतर अनेक लेखांतून वाचकांसमोर त्यांचे काही पैलू आले आहेत, पण त्यांच्या विचारातील आणि व्यक्तित्वातील समोर न आलेलेही अनेक पैलू आहेत. ते जाणून घेण्यासाठी त्यांच्यासोबत मारलेल्या या दिलखुलास गप्पा.

### राजीव साने यांची सुलटतपासणी

डॉ. अजय ब्रह्मनाळकर । संजीवनी चाफेकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

शिक्षण, प्रादेशिक अस्मिता, आर्थिक प्रश्न, राजकीय / सामाजिक आंदोलने! अनेक क्षेत्रांमधल्या वेगवेगळ्या समस्या आणि अनेक प्रश्न. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी एक नवे वळण देणारी, समस्यांकडे पाहण्यास एक नवी दृष्टी देणारी समंजस उजवेपणाची भूमिका. या भूमिकेतून प्रचलित दुराग्रह व गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न म्हणजे

### गल्लत, गफलत, गहजब

राजीव साने

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)







ऊर्जेनं भरलेली, सकारांनी गजबजलेली, आत्मविश्वासानं सजवलेली आणि बंधुभावनेनं बहरलेली. विचारांची भूक लागलेल्यांना पोटभर देणारी...

### शिदोरी-२

साईसेवेची, उद्योजकतेची व सामाजिकतेची

डॉ. सुरेश हावरे

किंमत : ₹ २३०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## नात्यास नाव आपुल्या...

*हे पुस्तक जगदीश गोडबोले या सच्च्या कार्यकर्त्याचं चरित्र, एका लोकविलक्षण नात्याची आधीअधुरी कथा यापुरतं मर्यादित नाही. मला ही चांगल्या-वाइटासह स्वीकारलेल्या एका उत्कट प्रेमाची कहाणी वाटते. निरागसतेकडून डोळसपणाकडचा हा प्रवास वाटतो मला. आणि संस्थात्मक कार्याला योग्य दिशेनं घेऊन जाणारं मार्गदर्शक म्हणूनही हे पुस्तक मला महत्त्वाचं वाटतं.*

देखणे ते चेहरे, जे प्रांजळाचे आरसे...

अर्चना गोडबोले यांनी छान सही करून भेट म्हणून दिलेलं हे पुस्तक नुकतंच वाचून खाली ठेवलं! अर्चनाताईंशी परिचय झाल्यामुळे या पुस्तकाचा शेवट वाचायच्या आधीच माहीत होता, त्यामुळे ते पुस्तक वाचून संपल्यावर स्तब्ध वगैरे झाले नाही मी. उलट, जगदीश गोडबोले नावाच्या भरकटलेल्या वादळाशी परिचय होता होता अर्चना जगदीश या 'बंदराशी' जास्त थबकले मी! तेरा वर्षांच्या, लौकिक नसलेल्या संसारानंतर, आज अठरा वर्षांनीही त्यातलं अलौकिकत्व जपणं सोपं नाही. बाई मूलत: असतेच स्थिर. समस्यांवर मात करून उभं राहण्याची ताकद असते तिच्यात. पण सगळ्याच स्त्रियांना स्वत:तली ही ताकद ओळखता येतेच, असं नाही. अर्चनाताईंसारख्या फार थोडक्या जणी हे जाणून-उमजून, डोळसपणे आयुष्याकडे पाहतात. हळव्या नात्यातल्या एकाच्या पश्चात दुसऱ्यानं त्यावर लिहिणं, दुधारी तलवारीच्या पात्यावरून चालण्यासारखं आहे. आता प्रत्यारोप करणारा अस्तित्वात नसतो आणि अशा वेळी दोन्ही बाजूंचा तोल सावरत, तटस्थपणे त्या नात्याकडे पाहणं, त्यातले जिवाभावाचे क्षण आठवणं आणि त्याहीपेक्षा नसलेल्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं न करणं हे अर्चनाताईंना फार छान जमलंय लिहिताना! उलट, पानापानावर जगदीश गोडबोले या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाचं गारूड आपल्याला जाणवतं. आज AERF या संस्थेचं काम व्यापक स्वरूपात करताना अर्चनाताई आपल्या दिवंगत पतीचं स्मरण क्षणोक्षणी करताना दिसतात. भल्याबुऱ्या सगळ्या क्षणांनंतर, वयात एकोणीस वर्षांचं अंतर असणाऱ्या पतीपत्नीचं नातं पणाला लागावं असे असंख्य प्रसंग अनुभवल्यानंतरसुद्धा अर्चनाताई आतून लिहितात, ते जगदीश नावाच्या नितांतसुंदर प्रेमाबद्दल. आपणही

जगदीश गोडबोले यांचे मानसिक आजार, व्यसनं आणि स्वैर आयुष्य यांपेक्षाही त्यांच्या रसिकतेवर, आकर्षक व्यक्तिमत्त्वावर, विलक्षण बुद्धिमत्तेवर, त्यांच्या निसर्गप्रेमावर, वैचारिक लिखाणावर आणि त्यांच्यातल्या निरागसतेवर अधिक फिदा होतो. एक झंझावाती वादळ अकाली शमल्याबद्दल हळहळत राहतो.

'नात्यास नाव आपुल्या...' हे पुस्तक जगदीश गोडबोले या सच्च्या कार्यकर्त्याचं चरित्र, एका लोकविलक्षण नात्याची आधीअधुरी कथा यापुरतं मर्यादित नाही. मला ही चांगल्या-वाइटासह स्वीकारलेल्या एका उत्कट प्रेमाची कहाणी वाटते. निरागसतेकडून डोळसपणाकडचा हा प्रवास वाटतो मला. आणि संस्थात्मक कार्याला योग्य दिशेनं घेऊन जाणारं मार्गदर्शक म्हणूनही हे पुस्तक मला महत्त्वाचं वाटतं. वैयक्तिक अनुभवांना सोबत घेऊन सामाजिक काम कसं करावं, काय करू नये, याचा वस्तुपाठ देणारं हे पुस्तक आहे. आंदोलनं, चळवळी यांपेक्षाही मूलभूत कार्याची गरज अधोरेखित करणारं हे पुस्तक आहे. शिस्तबद्ध कार्यपद्धती, जमिनीवर राहून करावा लागणारा सारासार विचार, सामाजिक कामांतल्या कालानुरूप बदलत जाणाऱ्या गरजा, टिपणं-नोंदी यांचं महत्त्व, निधी संकलन अशा विविध विषयांचा जो आनुषंगिक ऊहापोह अर्चनाताईंनी केला आहे; तो पर्यावरणातीलच नव्हे, तर कोणत्याही सामाजिक समस्येच्या मुळाशी जाऊन काम करणाऱ्या संस्थांना निश्चितच पथदर्शक आहे.

लोकविलक्षण व्यक्तींना सदैव अस्वस्थतेचा शाप असतो हेच खरं. अर्थात आयुष्याची वाटचाल डोळसपणानं केली, तर ही अस्वस्थता वरदानही ठरू शकते. पण यातली सीमारेषा ठरवणं तितकंसं सोपं नाही. जगदीश गोडबोले यांच्या आयुष्यात अशा अस्वस्थतेचा शाप आणि वरदान यांचं मिश्रण होतं. याची झळ पत्नी म्हणून अर्चनाताईंना लागणं अपरिहार्य तर होतंच, शिवाय ते त्यांनी स्वत:हून स्वीकारलेलंही होतं. त्यामुळे त्याबद्दल त्यांची तक्रार नव्हती, आजही नाही. उलट सर्वसामान्य मध्यमवर्गीय घरातली एक बुद्धिमान, स्वतंत्र विचारांची मुलगी जेव्हा डोळसपणे हा


बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण मराठी कादंबरीला नवं नाही. पण बायकांचा समूह मात्र क्वचितच कोणी रंगवला... एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...




बाय गं...

सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

जीवनप्रवास स्वीकारते, तेव्हा त्याच्या चांगल्या-वाईट परिणामांना सामोरं जाण्याची पूर्ण तयारी तिनं केलेली असते. आणि आयुष्य म्हणजे दुसरं असतं तरी काय? कधी स्वत: स्वीकारलेले निर्णय, तर कधी इतरांनी लादलेले निर्णय... कसेही असोत, ते सर्वशक्तीनिशी निभावणं हेच समजूतदार माणसाच्या हाती असतं ना! आयुष्य खूप काही शिकवत असतं आपल्याला; क्षण क्षण आपल्या संयमाची, समजूतदारपणाची परीक्षा बघत असतं. अर्चनाताईंसारखी मनस्वी स्त्री स्वत:ला या सगळ्यातून घडवत गेली, टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडातून सुबक मूर्ती नाही तयार होत! अर्चनाताईंकडे हे घाव सोसण्याची हिंमत पूर्वीपासूनच होती असं नाही, उलट त्यांनी या पुस्तकामध्ये कितीक वेळा हे सांगितलं आहे, की जगदीशकडूनच मी हे शिकत आले. असंख्य कटू आठवणी असूनही, दोघांच्या सहजीवनातले सुवर्णक्षण अर्चनाताईंनी कृपणाच्या धनराशीसारखे मनाशी जपून ठेवलेले आपल्याला जाणवतात. स्वत:च्या आयुष्याचा वेगवान प्रवाह विस्तारित करत असतानाही, क्षणोक्षणी मानसिक आजारानं कोसळत असणाऱ्या आपल्या पतीला त्या सांभाळून घेत राहिल्या, समजून घेत राहिल्या आणि प्रत्येक वेळी उत्कट क्षणांची पुरचुंडी संसारासाठी खुली करत राहिल्या.

समाजासाठी काहीतरी ठोस, घडीव कार्य करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी हे पुस्तक वाचलंच पाहिजे, संस्थात्मक बांधणीचा आदर्श वस्तुपाठ यामध्ये आहे. प्रेमाची ताकद समजून घ्यायची असेल, तर प्रत्येक संवेदनशील व्यक्तीनं हे पुस्तक डोळसपणे वाचलं पाहिजे, असं मला वाटतं. आजच्या झपाट्यानं कोसळत जाणाऱ्या कुटुंबव्यवस्थेच्या काळात अहंकार बाजूला ठेवून संसार सांभाळता येतो, त्या बरोबरीनंच व्यक्तिमत्त्वविकासही घडवता येतो, पती-पत्नीनं एकत्रितपणे वैचारिक असं काही घडवता येतं, हे या पुस्तकातून आपल्याला जाणवतं. खरंच, ही कहाणी सफल प्रेमाचीच आहे; फक्त ही सफलता सर्वसामान्यांच्या समजुतीपलीकडची आहे!

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, हे सगळं लिहिताना अर्चनाताईंना काही

मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं;
हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा
निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं?
काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे,
एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.

विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)



सिद्ध करायचं नाहीये, कुणाला अप्रत्यक्षपणे काही सुनवायचंही नाहीये. ज्या बाईनं आपल्यापेक्षा एकोणीस वर्षांनी मोठ्या असलेल्या मनस्वी पुरुषावर अतोनात प्रेम केलं, त्याच्यातील गुणांवर पुन्हापुन्हा विश्वास ठेवला, त्याच्यातल्या दोषांची शास्त्रीय कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न केला, त्या दृष्टीनं औषधोपचार केले आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, तेरा वर्षांच्या संसारात हात सोडून द्यावा असे अनेक प्रसंग उद्‌भवूनही जी हे नातं जिवापाड जपत राहिली; तिला काय सिद्ध करायचं असणार? आणि कुणासाठी?

अर्चनाताई खऱ्या अर्थानं एक स्वतंत्र व्यक्ती आहेत. जगदीश गोडबोले या परीसस्पर्शानं त्या आणखीनच उजळून निघाल्या आहेत. आजही, एवढ्या वर्षांनीसुद्धा 'कार्यक्रमाच्या वेळी उपस्थितांना मोगऱ्याचे गजरे देऊ, कारण जगदीशला ते आवडायचं.' हे त्या ज्या निरागस प्रेमानं सांगतात, तेव्हा जाणवतं, 'जगदीश' नावाचं वादळ आजही जिवंत आहे!

***आसावरी देशपांडे जोशी***
७०५७५५७५०८

आपण जगलेल्या सहजीवनाबद्दलचं हे चिंतन म्हणजे जीवनाच्या सगळ्या कडूगोड अनुभवांकडे निर्मळ मनानं पाहत घेतलेला स्वत:चा शोध!

नात्यास नाव आपुल्या...

अर्चना जगदीश

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)





ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची, भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने आणि साध्य काहीही असो, आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)




# गाऊ त्यांना आरती

‘भारतरत्न’ हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची ‘राजहंसी’ चरित्रे

## अटलजी

*अटलबिहारी वाजपेयी यांना २०१५ साली ‘भारतरत्न’ या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. ‘अटलजी - कविहृदयाच्या राष्ट्रनेत्याची चरितकहाणी’ हे सारंग दर्शने लिखित पुस्तक ‘राजहंस’ने २०१८ साली प्रकाशित केले. नुकतीच या पुस्तकाची जनावृत्ती प्रकाशित झाली आहे. त्यातील ‘ ‘अटलवादा’ची अक्षय देणगी’ या प्रकरणातील हा संपादित अंश.*

स्वातंत्र्योत्तर भारतात कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही नेत्याची राजकीय आणि संसदीय कारकीर्द अटलजींइतकी प्रदीर्घ झालेली नाही. स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा अटलजी संघाचे प्रचारक होते आणि स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव झाला, तेव्हा पुन्हा पंतप्रधान होण्याच्या तयारीत. मधल्या काळात अनेक राजकीय हत्या, तीन युद्धे, असंख्य निवडणुका, आर्थिक चढउतार, जातीय दंगली, आणीबाणीचे घातचक्र, घराणेशाहीची वाढती पकड, राष्ट्राच्या ऐक्याला बसलेले फुटीर आंदोलनांचे हादरे, सार्वजनिक जीवनातील वाढती असहिष्णुता, विरोधकांच्या ऐक्याचे फसवे प्रयोग, जनसंघ आणि भाजपची पराभवांच्या तडाख्यांमधूनही विस्तारत गेलेली वाटचाल, आर्थिक धोरणांचे दोन ध्रुव, भ्रष्टाचाराचा अजगरी विळखा, विविध जातिसमूहांना नव्याने सापडणारी धारदार अस्मिता, दहशतवादाने उडवलेली झोप, या साऱ्यांतून होणारी संसदीय लोकशाहीची धिमी पण दमदार वाटचाल... अशा साऱ्या अनुभवांतून ते गेले होते. जनसंघ स्थापन करताना गोळवलकर गुरुजी यांनी रा. स्व. संघाचे जे पूर्णवेळ प्रचारक श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या हाती सोपवले, अटलजी त्यांतलेच एक. ते स्वत:च्या पहिल्यावहिल्या निवडणुकांमध्येही थेट देशाच्या प्रश्नांवर बोलू लागले. त्यामुळे ते लोकसभेत पाऊल टाकताक्षणीच ‘राष्ट्रीय नेते’ झाले. लोकसभेत त्यांचे पहिले अवघ्या काही मिनिटांचे भाषण झाल्यानंतर ‘बाटलीतून राक्षस बाहेर आला..’ हे पक्षांतर्गत स्पर्धकांनी काढलेले उद्गार अटलजींची क्षमता व संभाव्य झेप दाखवणारे होते. मात्र या ‘राक्षसा’कडे पंतप्रधान पंडित नेहरू यांचे लक्ष गेले

आणि त्यांनी सभापतींना या तरुण खासदाराला केवळ पक्षबळाचे त्रैराशिक न मांडता अधिक वेळ देण्याची विनंती केली. परराष्ट्र संबंधांवर अस्खलित हिंदीत बोलणाऱ्या एकमेव अशा अटलजींना हिंदीतच उत्तरे देण्याची खबरदारी घेतली आणि परदेशी पाहुण्यांना 'संसदेतला माझा कठोर तरुण टीकाकार' अशी ओळख करून देण्याची उमेदही दाखवली.

अटलजी घरात लहान होते. त्यांना आजोबांपासून मोठ्या भावंडांपर्यंत सर्वांचे मन:पूत प्रेम मिळाले. वडील तर त्यांना मित्रच मानत. त्यामुळे असुरक्षेच्या भावनेने अटलजी कधी गांगरले नाहीत. त्यांचा आत्मविश्वास पहाडी संकटातही डळमळत नसे. गंगा-यमुनेच्या खोऱ्यांना जे मोकळ्याढाकळ्या, ऐसपैस जीवनशैलीचे वरदान लाभले आहे; ती त्यांच्यात उतरली होती. सहवासात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचे उबदार स्वागत करून तिला जवळ घेण्याची मानसिक तयारी असणे, हा संघाचा संस्कार अटलजींनी पुरता आत्मसात केला होता. त्यांचे मनही निसर्गत:च स्वागतशील होते. राजकीय धावपळ करताना त्यांच्या अंतर्मनात कविता रुणझुणत असे.

संसदेत नेहरूंशी कधी थेट वाद करीत, तर कधी त्यांची प्रशंसा झेलत अटलजींनी स्वत:ची राजकीय उंची वेगाने वाढवत नेली. त्या काळात देशभर काँग्रेसचा एकछत्री अंमल होता. जनसंघाला तगडे उमेदवार मिळण्याची मारामार. अशा वेळी लोकसभेच्या तीन-तीन मतदारसंघांत अर्ज भरण्यासाठी व पराभूतही होण्यासाठी जी हिंमत लागते, तीत अटलजी कमी पडले नाहीत. या चिकाटीमागे 'डॉ. हेडगेवार यांनी पेरलेले बलवान हिंदुराष्ट्राचे स्वप्न' हीच प्रेरणा होती. पुढे त्यांची राष्ट्रवादाची संकल्पना अधिक व्यापक, परिष्कृत होत गेली.

मुस्लिमांचा द्वेष न करणारे हिंदुत्व आणि पाकिस्तानचा तिरस्कार न करणारी परराष्ट्रनीती ही अटलजींची खासियत होती. अटलजी ज्या परिवारात वावरत

भारतरत्न लता मंगेशकर ◆ पी. व्ही. सिंधू ◆ अमीश त्रिपाठी
सद्‌गुरू ◆ अमित शाह ◆ अनुपम खेर ◆ सुधा मूर्ती
अजित डोभाल (कीर्तिचक्रविजेते) अशा नामवंत तज्ज्ञांनी
मोदींच्या कारकिर्दीचे केलेले विश्लेषण




मोदी @ 20 : स्वप्ने होती साकार

लेखांचे संकलन
संपादक : आनंद हर्डीकर

किंमत : ₹ ८९५/- । (ट.ख. ₹ ५०)

होते, तेथे हा दृष्टिकोन न पटणारेही अनेक होते. पण एकदा फाळणी झाल्यावर भारतीय लोकसंख्येचे गणित जसे बदलू शकत नाही, तसेच पाकिस्तान हा कायमचा शेजारी असणार, याची शहाणीव अटलजींच्या वागण्या-बोलण्यात असे. याचबरोबर आपला तत्त्वविचार किंवा धोरण हे कुणाच्याही सापेक्ष नसावे, याची काळजी ते घेत राहिले. त्यामुळे कारगिल झाल्यानंतरही अटलजी पुन्हा पाकिस्तानला चर्चेची दारे कशी उघडतात, याचे अनेकांना नवल वाटले. परवेझ मुशर्रफ यांच्या आडमुठेपणाने व एकट्याने पत्रकार परिषद घेण्यामुळे 'आग्रा परिषद' फसली, तरी विजेता असूनही भारत बोलायला तयार होता, हा संदेश जगात गेलाच. ही बोलणी करतानाही अटलजी किती सावध होते, याची आठवण त्यांचे सचिव आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार दिवंगत ब्रजेश मिश्र सांगत. त्यांनी सांगितले आहे, ''आम्ही मुशर्रफ यांच्यासोबत होणाऱ्या चर्चेचे मुद्दे लिहून काढले आणि अटलजींना दाखवले. त्यांनी ते वाचले. त्यांत चौथा मुद्दा होता, 'परस्परांच्या भूमीवरून एकमेकांच्या विरोधात दहशतवादी कृत्ये होणार नाहीत..' अटलजींनी हातात पेन्सिल घेतली आणि फक्त चौथा मुद्दा वर्तुळ करून पहिल्या क्रमांकावर आणून ठेवला. तेवढ्या एका कृतीने चर्चेचा आरंभच पाकिस्तानला पेचात पकडणारा ठरणार होता..''

१९७७ ते ७९ हा जनता सरकारचा काळ अटलजींच्या वाटचालीत निर्णायक ठरला. परराष्ट्रमंत्री म्हणून अटलजींनी देशालाच नव्हे, तर जगाला स्वत:चे नवे दर्शन घडवले. चीनदौरा, पाकला दोस्तीचा हात, इस्राइलशी अंतर राखून यासर अराफत यांची पाठराखण आणि अलिप्तता चळवळीशी पक्की बांधिलकी यांतली एकही गोष्ट जनसंघाच्या नेत्याकडून अनेकांना अपेक्षित नव्हती. जनसंघाची प्रतिमा आणि अटलजींची व्यक्तिगत छबी यांच्यातले अंतर वाढत गेले ते इथपासून. अटलजींची प्रतिमा कांकणभर सरस होत गेली. 'राइट मॅन इन रॉंग पार्टी' अशी वर्णने होऊ लागली. पाकशी दोस्ती करण्याची भाषा भारतीय मुस्लिमांना दिलासा देणारी होती. १९७०मध्ये भिवंडी दंगलीनंतर 'अब हिंदू मार नहीं खायेगा..' अशी तिखट भाषा अटलजींनी लोकसभेत केली होती. पुढे अयोध्या आंदोलनाच्या काही सभांमध्ये सहभागी होऊनही ते उन्मादापासून कटाक्षाने दूर राहिले. आंदोलनात थेट उतरले नाहीत. 'आप राम की अयोध्या में जा रहे हो, रावण की लंका में नहीं...' असे कारसेवकांना



आवृत्ती (५वी) । किंमत : ₹ ४५०/- । (इ.बु.₹ ५०)

सुनवायला त्यांनी कमी केले नाही. भाजपने पुन्हा जनसंघाच्या अवतारात शिरावे, असे अटलजींना वाटत नव्हते.

या एकाकीपणाला अटलजी स्वत:ही काहीसे जबाबदार होते. १९८०मध्ये जनता पक्षातून बाहेर पडून भाजप जन्माला आला, तेव्हा पक्षध्वजात हिरवा रंग आला. सिकंदर बख्त, राम जेठमलानी, अरिफ बेग, (जनसंघापासून सोबत असणारे) जसवंतसिंह इत्यादी मुळात संघपरिवारात नसणाऱ्या नेत्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले.

मात्र 'गांधीवादी समाजवाद' ही अटलजींच्या हातून घडलेली भलतीच गफलत ठरली. एकतर, जनसंघाच्या आर्थिक विचारांत कधीही 'समाजवाद' नव्हता. दीनदयाळ उपाध्याय यांचा 'एकात्म मानवतावाद' काही बाबतींत गांधीवादाशी नाते सांगत असला, तरी जनसंघाला जोखडमुक्त अर्थव्यवस्था असणारा 'उजवा आर्थिक विचार'च हवा होता. सभांमध्ये अटलजींनी अनेकदा इंदिरा गांधी यांच्या 'गरिबी हटाव'शी स्पर्धा करणारी डावी भाषा केली असली, तरी सारे उद्योगधंदे सरकारनेच करण्याच्या हट्टाची त्यांनी संसदेत थट्टा केली होती. या हल्ल्यातून नेहरूही सुटले नव्हते. असे असूनही १९८०मध्ये अटलजींनी 'गांधीवादी समाजवादा'चा आपला आग्रह पक्षाला स्वीकारायला लावला.

पक्षाच्या आत किंवा बाहेर काहीही स्थिती असली, तरी अटलजींचे हक्काचे आणि प्रेमाचे स्थान होते, ते संसद! सभागृहातल्या भाषणांची ते कसून तयारी करत. अधिक वेळ मिळण्यासाठी सभापतींशी प्रसंगी हुज्जत घालत. सुसंस्कृत युक्तिवादाची मर्यादा न ओलांडता विरोधकांना घायाळ करून टाकत. सभेतले वक्तृत्व आणि सभागृहातले संयमी वक्तव्य यांच्यातला फरक अटलजी कधी विसरले नाहीत. लोकसभेत त्यांची निर्विष विनोदबुद्धी सदैव जागी असे. त्यातून ताण निवळे. सभागृहाची माफी मागण्याची पाळी आलीच, तर ते मागे सरत नसत. खुल्या दिलाने माफी मागत. अटलजी संसदेत आले, तेव्हा भारतात संसदीय लोकशाही रुजत होती. एकेक पायंडे पडत होते. अशा वेळी संयमी, उदार व विरोधकांशी कधीही संवाद न तोडण्याच्या अटलजींच्या शैलीने मानदंड प्रस्थापित केला. 'लोकशाही म्हणजे चर्चा' अशी व्याख्याच आहे. अटलजींची संसदीय कारकीर्द अशा अर्थपूर्ण वाद-संवादांची खाण आहे.

अटलजींनी पुढे भाजपची सत्ता आल्यानंतर पी. व्ही. नरसिंहराव सरकारने खळाळता केलेला आर्थिक सुधारणांचा प्रवाह जोमदार केला. कर्मचाऱ्यांच्या संपापुढे न झुकता दूरसंचार क्षेत्राची भविष्यवेधी फेररचना केली. हीच आधुनिक दृष्टी त्यांनी दिल्ली मेट्रोची पायाभरणी करून, सर्वशिक्षा अभियान सुरू करून, महामार्गांचा सुवर्ण चतुष्कोन साकारून दाखवली. राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाचा गंभीर फेरविचार करूनही दाखवली.

अटलजींनी अणुचाचणी करताना मात्र विलक्षण धमक व राजकीय धडाडी

दाखवली. आर्थिक निर्बंधांचा धोका पत्करला. सत्ताधारी पक्ष बदलले, तरी भारत सरकारच्या राष्ट्रीय प्राथमिकता कशा कायम राहतात, हे जगाला दाखवून देणारा हा निर्णय होता. पण झापडबंद भाजप विरोधकांना तो झेपला नाही. अनेक वृत्तपत्रे गरळ ओकू लागली. अटलजी या वेळी लोकसभेत म्हणाले, ''इंदिराजींनी पहिली अणुचाचणी केली, तेव्हा आम्ही तिचे स्वागत केले होते. विरोधक म्हणतात, 'आज भारताला कोणता धोका आहे?' तेव्हा तरी काय धोका होता? धोका दिसला, तरच उपाय करायचे का? उलट जे धोके आले असते, तेही अणुचाचणीमुळे परस्पर टळतील!''

अणुचाचणी करताना अटलजींनी जी धडाडी दाखवली, ती इतर तीन महत्त्वाच्या प्रसंगांमध्ये मात्र दिसली नाही. पहिला, दहशतवाद्यांनी केलेले विमान अपहरण. दुसरा, गुजरातमधील दंगलींचा फटका सार्वत्रिक निवडणुकांमध्ये बसू शकतो, हा अटलजींचा होरा भविष्यात योग्य ठरला. तिसरा, म्हणजे २००४मध्ये निवडणुका अलीकडे आणायला नकोत आणि 'इंडिया शायनिंग' ही प्रचाराची अधोरेखा नको, असे अटलजींचे अंतर्मन त्यांना बजावून सांगत होते. मात्र तेथेही लाल कृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, प्रमोद महाजन यांचा आग्रह त्यांनी अखेर मानला. देशाचे जनमानस टिपण्यातली या नेत्यांची चूक अखेर सत्ता घेऊन गेली.

या पराभवानंतरही अटलजींची व्यक्तिगत लोकप्रियता कमी झाली नाही. याचे कारण त्यांची भारतावरची मोहिनी. अगदी टीव्हीपासून कोणतीही आधुनिक माध्यमे नव्हती, त्या काळात त्यांचे वर्णन 'हृदयसम्राट' असे होत असे. एकाच वेळी हजारो श्रोत्यांशी हृदयसंवाद साधण्याची हातोटी हे त्यांचे बलस्थान होते. त्यांचे जन्मजात ब्राह्मण्य त्यांच्या व्यक्तिगत आचरणात कधी आले नव्हतेच; पण राजकारणातही त्यांनी जात व प्रांत ही चौकट सहज ओलांडली. हिंदुत्ववादी शक्तींचा भारतीय राजकारणातला वावर सावरकर बंधूंच्याही आधीपासून सुरू झाला होता. तरी


सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक दुर्लक्षित पैलू
विश्वासार्ह कागदपत्रांच्या साहाय्याने उजेडात आणणारा
व सावरकरांवरील अनेक टीकांचे सज्जड प्रमाणांच्या
आधारे निराकरण करणारा मौलिक दस्तऐवज.




वीर सावरकर

उदय माहूरकर आणि चिरायू पंडित
अनुवाद : डॉ. उदय निरगुडकर

किंमत : ₹ ४००/- । (ट. ख. ₹ ५०)

स्वातंत्र्यानंतर विशाल जनाधार असणारा पहिला हिंदुत्ववादी नेता होण्याचा भाग्ययोग अटलजींच्या पत्रिकेतच होता. तो त्यांनी विनम्रतेने सांभाळला.

भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत बसणारे भारतीयत्व आणि अटलजींचे हिंदुत्व यांच्यात फरक दाखवता येणार नाही. तो भारतीय राष्ट्रवादच आहे. भारतात अनेक दशके धुमाकूळ घालणाऱ्या कृतक धर्मनिरपेक्षतेच्या पार्श्वभूमीवर तो अधिक उठून दिसतो इतकेच. अटलजींचे अफगाणिस्तानात 'अटक' येथे भेट दिल्यानंतरचे, गीतरामायणावरचे, ग्रंथालयांवरचे भाषण पाहिले; तर त्यांचा पूर्वगौरव किती उन्नत आणि वर्तमानाच्या उत्कर्षाचे स्वप्न पाहणारा आहे, याची प्रचिती येते.

स्पष्ट भूमिका घेताना लोकनेत्यांना अनेकदा अवघडलेपण येते. तसे ते अटलजींना कधी आले नाही. नेहरू यांच्या श्रद्धांजली सभेत एका वक्त्याने त्यांचा उल्लेख 'गद्दार' असा केल्यानंतर अटलजी संतापले. कुणाची फिकीर न करता 'या व्यासपीठावर बसल्याची मला आज शरम वाटते...' असे ऐकवून त्यांनी श्रोत्यांसमोर नेहरूंच्या गुणविशेषांची माळ गुंफली.

ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोने 'रिपब्लिक' या ग्रंथात 'तत्त्वज्ञ राजा' अशी संकल्पना मांडली. तेव्हाच्या नगर-राज्यातील दुरितांचे तिमिर हरायचे, तर तत्त्वज्ञ राजा हवा; कारण त्याचे सर्वाधिक प्रेम सत्य व तर्कावर असते, असे प्लेटोने म्हटले होते. अटलजी या व्याख्येत बसणारे राज्यकर्ते होते. त्यांच्या कविता लोकमांगल्याचे तत्त्वज्ञान गातात. ध्येय आणि कृती यांच्यात सुसंगती असावी, याची काळजी त्यांनी बहुपक्षीय कुरकुरती मोट सांभाळताना घेतली. अटलजींना स्वत:ला या 'तत्त्वज्ञ राजां'च्या यादीत पहिले नाव कदाचित पंडित नेहरूंचे आवडले असते!

अटलजींचे व्यक्तिमत्त्व, वारसा, कार्यशैली आणि दूरदृष्टी या साऱ्याला मिळून 'अटलवाद' असे नाव दिले; तर तो स्वतंत्र भारताच्या वाटचालीतील अनमोल ठेवा आहे. या 'अटलवादा'त काय येते? लोकशाहीवरची अढळ निष्ठा व संसदीय प्रणालीवरचे अपार प्रेम येते. सर्वांना सामावून घेणारा जाज्ज्वल्य भारतीय राष्ट्रवाद येतो. 'संवाद' या मूल्याची बांधिलकी येते. विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून पाहिलेले 'अंत्योदया'चे स्वप्न येते. समर्थ पण सहिष्णू भारताचे संकल्पचित्र येते. लोकशाही टिकण्यासाठी संस्थात्मक जीवनाचा सन्मान येतो. सार्वजनिक जीवनात शत्रू कोणीच नसतो, असतात ते केवळ विरोधक... ही श्रद्धा येते. मतभेद बाजूला ठेवून जास्तीत जास्त जणांना सोबत घेऊन जाण्याची ओढ येते. तत्त्वनिष्ठा कायम ठेवूनही दिलदार सामोपचार करण्याची असोशी येते. जगाचे आकलन येते, तसेच खऱ्या भारताचे भानही येते..

असा अटलवाद ही अटलजींची अक्षय देणगी आहे!

जोवर भारतीय लोकशाही आहे, तोवर सोबत राहणारी!!

❖



# चित्र पाहीन आवडी

## माणसे चित्रे का काढतात?

माणसे चित्रे का काढतात? प्रश्न साधा आहे; पण उत्तर पाहत गेले, की जरा प्रकरण जटिल होत जाते. कितीतरी कारणांसाठी चित्रे काढली जातात. पाहताना हा उद्देश समोर असेल, तर आपले चित्र पाहण्याचे काम विनासायास होणे शक्य होते. अर्थात उद्देश बदलतात आणि सौंदर्य-परिमाणे बदलतात, हे लक्षात घ्यायला हवे. 'चित्र पाहीन आवडी'च्या प्रवासात हे दिशादर्शक आपली मदत करेल असे वाटते.

सर्वप्रथम आपण एक यादी करू या 'माणसे चित्र का काढतात?' याची...

आनंदासाठी चित्रकला, कलेसाठी-कला म्हणून चित्रकला, सजावटीसाठी कला, संपर्कासाठी कला, अभिव्यक्त होण्यासाठी कला, शिक्षणमाध्यम म्हणून कला, मनोरंजनासाठी कला, लोकोपदेशासाठी कला, संभाषणासाठी चित्रकला, जादूटोण्यासाठी चित्रकला, धर्मासाठी चित्रकला, मन:शांतीसाठी चित्रकला, आरोग्योपचार म्हणून चित्रकला, नोंद अथवा आठवण म्हणून चित्रकला, छंद म्हणून चित्रकला, जगण्यासाठी चित्रकला.

देश, समाज आणि व्यक्तिपरत्वे ही उत्तरे बदलत असतात. परंतु आपण मुळात गेलो की, कलेचे उद्देश नजरेत येत जातात. यात अपेक्षित असे आहे की; पाहणाऱ्याला चित्र पाहताच त्या पाठीमागील उद्देश समोर आला की, बरेचसे काम झाले. पण ती सवय करणे आणि पाहण्याची तालीम करणे गरजेचे आहे. दररोज... सहज शक्य होईल तेव्हा...

आपण याबाबत एकेका भागात, एकेका उद्देशावर बोलू या...

'आनंदासाठी चित्रकला' असे म्हणताना कोणाचा आनंद? तर चित्रकाराचा आनंद असे लक्षात घेता येईल. आपण क्लॉड मोनेट याची चित्रे या संदर्भात पाहू या. आनंदासाठी कलेचे उदाहरण म्हणजे क्लॉड मोनेटची चित्रे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मोनेट हा फ्रेंच इंप्रेशनिस्ट चित्रकार होता, ज्याने आपल्या कलेचा उपयोग नैसर्गिक दृश्ये आणि प्रकाशाच्या बदलत्या प्रभावांचे चित्रण करण्यासाठी केला.

क्लॉड मोनेट आणि त्याची कामे आपण तपशिलात जाऊन, वेळ देऊन, रेंगाळून पाहिली की, त्यांतील बारकावे समोर येतात.

विषय-निवडीबाबत तो निसर्गदत्त महाराज होता. म्हणजे मोनेटच्या चित्रांचा मुख्य विषय निसर्ग हा होता. बागा, तलाव, पूल आणि लिलीची फुले त्याच्या चित्रांमध्ये



ठळकपणे दिसतात. ही संकल्पनेची निवड केवळ नैसर्गिक सौंदर्याचा उत्सवच नाही, तर ती शांतता आणि आनंदाच्या शोधाचेही प्रतीक आहे, असे कलावंत व इतिहासकार मानतात.

तंत्र म्हणजे चित्रे कशी काढली आहेत, हे पाहणे. मोनेटने इंप्रेशनिस्ट तंत्र वापरले, जे द्रुत आणि लहान ब्रश-स्ट्रोकवर अवलंबून आहे. या तंत्रामुळे त्याच्या चित्रांमध्ये हालचालीचा भास, चैतन्य आणि ताजेपणा येतो. ही प्रक्रिया कलाकारासाठी एक आनंददायी अनुभव आहे, कारण ती कला अधिक उत्स्फूर्त आणि अर्थपूर्ण बनवते.

प्रकाश आणि रंग यांतील आनंद मोनेटने मिळवला असावा आणि आपणही तो मिळवू शकतो इतकी ताकद त्याच्या चित्रांत आहे. मोनेटने त्याच्या चित्रांमध्ये प्रकाश आणि रंग यांचे जादुई संयोजन वापरले आहे. त्याने वेगवेगळ्या वेळी आणि ऋतूंमध्ये समान दृश्य रंगवले, ज्यामुळे दर्शकांना निसर्गाच्या सौंदर्याचे विविध पैलू अनुभवता येतात.

सौंदर्य आणि भावना यांसह चित्रे पाहिली आणि अनुभवली, तर मोनेटची चित्रे दर्शकांना निसर्गाचा सखोल संबंध आणि आनंद देतात. त्याच्या कलेत, दृश्य तपशिलांपेक्षा भावनिक प्रभाव अधिक महत्त्वाचा आहे. अशा प्रकारे त्याची चित्रे प्रेक्षकांना शहरी जीवनातील गर्दीपासून दूर घेऊन आनंद आणि विश्रांतीची भावना देतात.

'वैयक्तिक चित्र-अनुभव' आणि 'माणसे चित्रे का काढतात' असा एकत्र विचार केला, तर मोनेटसाठी चित्रकला हा एक वैयक्तिक प्रवास होता, ज्यामुळे त्याला आंतरिक समाधान आणि आनंद मिळाला. त्याची बाग आणि त्यात त्याने घालवलेला वेळ यांमुळे त्याची कला समृद्ध झाली आणि त्यातून त्याच्या सर्जनशील प्रक्रियेतील आनंदाचे महत्त्व दिसून आले. आजची कला आणि जीवन आपल्याला वेळ घालवायला आणि घुटमळायला वेळ देत नाही. परंतु त्याच्या बाबतीत असे नव्हते.

क्लॉड मोनेटची कला आनंदासाठी तयार केली गेली होती आणि ती दर्शकांना समान आनंद देते. त्याची चित्रे केवळ त्याचे कलेवरील प्रेमच दर्शवत नाहीत, तर दर्शकांना नैसर्गिक सौंदर्याशी आणि जीवनातील साध्या आनंदाशी जोडतात. आता आपण या संदर्भात भारतीय चित्रकार रझा यांच्या चित्रांबद्दल थोडक्यात जाणून घेऊ या.

मोनेटप्रमाणेच भारतीय चित्रकार रझालाही रंगांची आवड होती. त्याच्या चित्रांमध्ये रंगांचे संयोजन आणि त्यांची तीव्रता मोनेटच्या प्रभाववादी शैलीची आठवण करून देते. रझा यांनी भावना आणि अनुभव व्यक्त करण्यासाठी रंगांचा प्रभावी वापर केला. मोनेटचा आणि लँगहयमर ह्या दोघांचा प्रभाव रझाच्या कलेत, विशेषतः त्याच्या सुरुवातीच्या कामांमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. त्यांनी भारतीय संदर्भाशी जुळवून घेत एक अनोखी शैली विकसित केली, ज्याचा भारतीय कलेत तसेच आंतरराष्ट्रीय कलाविश्वात विशेष आदर केला जातो.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

ज्येष्ठ चित्रकार मारुती पाटील यांनी
जवळजवळ चार दशके अध्यापनाबरोबरच
स्वतः चित्रनिर्मिती केली.
त्यांच्या कलाप्रवासाचे अनुभव
व त्यांची काही चित्रे या पुस्तकातून
बघायला मिळतील.
मराठी व इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये उपलब्ध.



रंग रेषांचे सोबती

मारुती पाटील

पुठ्ठा बांधणी किंमत : ₹ ३५००/- । (ट. ख. ₹ १००)
साधी बांधणी किंमत : ₹ १४००/- । (ट. ख. ₹ १००)

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

### सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत, या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे, मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

### आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी । सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)





ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का? परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)



# असे जन्मले पुस्तक!

## गोंदणखुणा

विचार-भावनांचं प्रकटीकरण ही स्थूल घटना नाही. आपलं मन सतत नवं काही टिपत असतं, निरखलेलं चिंतनात उतरवत असतं. असं चिंतन केवळ आपली जाणीव व्यापत नाही, तर नेणिवेचाही प्रवास करतं. हे संचित म्हणजे आपल्या लेखनाभिव्यक्तीचा मूल स्रोत असावा, असं मला वाटतं.

आपल्या आत एक जग नांदत असतं. आपण बाह्य जगाचे असतो, तसेच आपल्या या आतल्या जगाचेही असतो. किंबहुना या आतल्या जगाशी आपण जितके अधिक जोडले जातो, संवादी होतो; आपल्या अभिव्यक्तीला तितके अधिक धुमारे फुटतात. आपला आत्माविष्कार चैतन्याचा कंद होतो. स्फुरणाचे क्षण चिमटीत पकडताना, ते शब्दांकित करताना माझ्या आतलं जग असं उत्कट-तरल होऊन नवनीतासारखं लौकिक जीविताच्या पृष्ठभागावर आलं आणि त्यातून इवलासाच जीव असणारी चैतन्याची छोटी-छोटी बेटं तयार झाली. 'गोंदणखुणा' संग्रहातील एकेक लेख असं चैतन्यबेट आहे. लेखात वर्णिलेला प्रसंग, घटित भौतिक जीवनातलंच आहे; मात्र त्याच्या चिंतनानं जीवनाचं जे एक तत्त्व मला गवसलं, ते त्या त्या लेखाचं गाभासूत्र झालं आहे. हा ललित लेखसंग्रह म्हणजे 'दैनिक तरुण भारत' (संवाद) या वृत्तपत्रातून एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या माझ्याच ललितलेखांचं पुस्तकरूप आहे.




किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

माझीच मला नव्यानं ओळख घडवणारा हा लेखनप्रवास मनाला आनंद देणारा आहे.

या लेखन वाटचालीत माझं सहचिंतन घडत गेलं, ते माझे कवी-मित्र श्री. हेमकिरण पत्की यांच्यासोबत. या लेखसंग्रहातल्या प्रत्येक लेखाचे ते कधी प्रथम वाचक झाले आहेत; तर कधी श्रोता झाले आहेत. त्यांनी मला वेळोवेळी

आत्मीयतेनं काही सुचवलंय, उणं ते पुरं करण्यासाठी बळ दिलंय, नवविचारांची वाट दाखवलीय. आमच्यातला सदोदित घडत गेलेला सहजसंवाद या ललित लेखनासाठीची प्रेरणा झाला आहे.

या ललित लेखसंग्रहातील अनेक लेखांचा जन्म एका विचित्र, विपरीत कालखंडातला आहे. संपूर्ण जग कोरोनाच्या महामारीत होरपळत होतं. व्यवहार ठप्प झाले होते. दळणवळण मंदावलं होतं. आम्ही सारे कुटुंबीय तात्पुरत्या वास्तव्यासाठी आमच्या गावी होतो. या सर्व बाह्य प्रतिकूलतेतही माझ्या मनाला या लेखनानं उभारी मिळाली. ज्या केंद्रबिंदूपासून माझ्या जीवनाचा परीघ विस्तारत गेला, त्या बालपणाच्या केंद्रातूनच प्रारंभीचे लेख लिहिले गेले आहेत. ललितलेख म्हटलं; की जीवनातल्या प्रेरक, अविस्मरणीय आठवणी, व्यक्ती आदींविषयीचे हृद्‍गत तसंच निसर्गचिंतन हे ओघानं येतंच; केवळ सोयीसाठी आत्मपर, निसर्गचिंतनपर, व्यक्तिपर व तत्त्वचिंतनपर लेख असे या पुस्तकाचे चार भाग केले आहेत. अंतर्यामी एकूणच लेखांचं मूलद्रव्य 'जीवनेच्छा व जीवनानुगामी तत्त्वचिंतन' असं आहे. या संग्रहाचा 'प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा तें!' हा पहिला भाग बालपणीच्या आठवणींचा असला, तरी जाणत्या वयात त्या मांडताना त्यासोबत एक तत्त्वचिंतनही आपसूकच घडलं आहे. माझ्या वाङ्मयीन आवडीनिवडी, अभिरुची, साहित्यविषयक जाणिवा ज्या प्रतिभावंत साहित्यिकांच्या लेखनातून प्रगल्भ होत चालल्या आहेत, त्या प्रतिभावंतांवरील लेख या संग्रहाच्या 'मानवतेचे महन्मंगल गाणे' या विभागात आहेत. निसर्गवर्णनपर लेख 'सौंदर्याच्या नव नव लीला' ह्या विभागात, तर आत्मचिंतनपर लेख 'स्वानंदाच्या 'त्या' रानात' या विभागात समाविष्ट केले आहेत.

ललितलेखसंग्रह प्रकाशित करायचा, हे निश्चित झाल्यावर जेव्हा मी सर्व लेख पुन्हा एकदा नजरेखालून घातले; तेव्हा मला जाणवलं, की निसर्ग हा सातत्यानं आपल्या चिंतनाचा विषय झाला आहे. त्याच्या निरीक्षणातून, समरसतेतून जीवनविषयक तत्त्वज्ञान अगदी सहज आपल्या लेखनात उतरलं आहे.

निसर्ग अनुभवायचा, तर आपण निसर्गच व्हायचं; असं माझे गुरू डॉ. सु. रा. चुनेकर नेहमीच म्हणत. या पुस्तकातील अगदी छोटाच जीव असलेल्या लेखांमध्ये जीवनविषयक, निसर्गविषयक जे मूलगामी चिंतन उतरलं आहे; त्यामागे चुनेकर सरांची माझ्यात रुजलेली ही जाणती दृष्टी निश्चितच आहे. थोर तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती म्हणतात, की When you are with nature; you are never lonely. या बीजवाक्याची प्रचिती मी ही लेखमाला आकाराला येत असताना अनेकवार घेतली आहे. निसर्गसहवासात एकटेपण तर जाणवत नाहीच, याउलट आपल्या चित्तवृत्ती बहरतात, मन सृजनोत्सुक होतं नि केलेल्या निरीक्षण-चिंतनातून केलेल्या वाचनाचा, घेतलेल्या विविध अनुभवांचा उत्तम परिपाक आपल्या लेखनात उतरलाय; हे मला उमगलं. या लेखांचं सदर सुरू असताना वाचकांचा लाभलेला भरभरून प्रतिसाद

खूपच आनंददायी होता. समाजमाध्यमांमुळे दर रविवारी काही क्षणांत लेख शेकडो लोकांपर्यंत पोहोचायचा. त्या वेळी अनेकांनी फोनद्वारे, संदेशाद्वारे अभिप्राय दिले. लेखांचं कौतुक केलं. सहअनुभूतीचा आनंद लाभल्याचं आवर्जून कळवलं. माझ्या लिहित्या हाताला त्यामुळे बळ मिळालं. सदर थांबल्यावरही आतुरतेनं अनेकांनी विचारणा केली. लेखांचं पुस्तकरूप लवकर व्हावं, असा सद्भाव व्यक्त केला. त्यामुळेच 'गोंदणखुणा' हा लेखसंग्रह प्रकाशित करण्याचं मी निश्‍चित केलं.

वर्तमानपत्रांतून लेख प्रसिद्ध झाले, तेव्हा लेखाला अनुरूप व सौंदर्यदृष्टिपूर्ण अशी छायाचित्रं निवडून देण्यात माझी मुलगी तनिष्का व तिचे बाबा प्रदीप यांनी मला वेळोवेळी साहाय्य केलं, याचं समाधान वाटतं. या लेखनप्रवासात त्यांचीही अखंड साथ मला लाभली आहे. कुटुंबातील अन्य सर्व सदस्यांनीही मला प्रोत्साहित केलं. हे पुस्तक आदरणीय विद्या बेलसरे, म्हणजेच माझ्या प्रिय बाईंना अर्पण करताना मला झालेला आनंद शब्दातीत आहे.

चित्रकार रविमुकुल यांच्या कलाप्रतिभेतून साकारलेल्या व पुस्तकातील आशयाला अनुरूप अशा मुखपृष्ठानं तसेच उपशीर्षकांचं सुलेखन व सजावटीनं पुस्तक अधिक




गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

**पत्र आणि मैत्र**

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

**वाणी आणि लेखणी**

दिलीप माजगावकर



दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट. ख. ₹ १००)

साजिरं झालंय. कवी हेमकिरण पत्की व माझी कन्या तनिष्का ह्या द्वयींनी रेखलेल्या रेखाचित्रांनी पुस्तकाचं अंतरंग बहरलं आहे.

आदरणीय माजगावकर सरांनी आणि संपूर्ण राजहंस परिवाराने लेख संकलनापासून ते पुस्तकनिर्मितीपर्यंत मला दिलेली साथसंगत माझ्यासाठी एक आनंदठेव आहे.

जागतिक पुस्तक दिनी हे पुस्तक प्रकाशित व्हावं अशी माझी मनोमन इच्छा होती आणि ती पूर्णत्वासही गेली, याचं समाधान वाटतं. याच दिवशी गोव्याच्या 'दै. सकाळ'मधून लेखक मुकेश थळी यांनी पुस्तकाची दीर्घ आस्वादक नोंद घेतली, याचाही आनंद झाला.

पुस्तकाचा प्रत्यक्ष प्रकाशन सोहळा मात्र १९ मे रोजी पुण्यात संपन्न झाला. असं असलं तरी पुस्तकाला प्रकाशनपूर्व आणि प्रकाशनानंतरही मिळत असलेला प्रतिसाद माझ्या पुढल्या लेखनासाठी प्रेरणादायी आहे. मराठी साहित्यक्षेत्रातील ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे, उमा नाबर, वंदना बोकील, संजय आर्वीकर, रजनीश जोशी, श्याम तारे, मीनाक्षी पाटील, सुभाष नाईक, दीपाली दातार, गोव्याचे सखाराम बोरकर अशा अनेक मान्यवरांनी पुस्तकाविषयी आवर्जून कळवलं. 'माय मराठी राज्य अध्यापक संघा'च्या रूपानं पुस्तक अल्पावधीतच राज्यभर पोहोचलं, हेही आवर्जून नोंदवावंसं वाटतं. अनेकांनी केवळ स्वत:साठीच नव्हे, तर भेट देण्यासाठीही पुस्तक घेतल्याचं आवर्जून कळवलं. आजचं युग माहिती तंत्रज्ञानाचं आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे क्षणार्धात संवाद साधणं शक्य आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक आदी माध्यमांतून सातत्यानं पुस्तकाविषयी अभिप्राय, प्रतिसाद मिळत आहे याचा आनंद वाटतो.



पुस्तकाला भरभरून मिळत असलेला प्रतिसाद नव्या लेखनासाठीची प्रेरणा देणारा आणि जबाबदारी वाढवणाराही आहे.

या लेखसंग्रहाच्या वाचनातून वाचकांचं भावजीवन समृद्ध व्हावं, हीच सदिच्छा.

धन्यवाद.

***डॉ. प्रिया निघोजकर***



# आठवणींच्या खिडकीतून

## घाट घातला - घट फुटला

अगदी निश्चित तारीख, वार सांगायचा झाला; तर शनिवार दि. १८ मे २०२४ दुपारी १ ते १.३०ची वेळ. साहित्य परिषदेच्या सभागृहातून डॉ. प्रिया निघोजकर यांच्या 'गोंदणखुणा' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ झाल्यानंतर दिलीप माजगावकर, सौ. रेखा माजगावकर, मी आणि माझी पत्नी सौ. संजीवनी बाहेर पडलो. घरी जाऊन 'उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' करण्यापेक्षा बाहेरच कुठेतरी 'वदनी कवळ घेता'चा कार्यक्रम करावा आणि मग निवांतपणे घरी जाऊन 'वामकुक्षी' करावी, असा कार्यक्रम मुक्रर झाला. गाडी डेक्कन जिमखाना प्रभात रस्त्यावरील 'दर्शन' हॉटेलच्या बाहेर थांबली. आम्ही आत गेलो. वरच्या मजल्यावर जागा मिळाली. टेबलापाशी जाताच सौभाग्यवतीने प्रश्न केला, ''या दर्शन हॉटेलची काही ओळख आठवते का?'' मी आठवण्याचा प्रयत्न केला, पण नाही आठवलं. मग तीच म्हणाली, ''काही वर्षांपूर्वी याच 'दर्शन'मध्ये बसून तुम्ही आणि माजगावकरांनी 'राजहंस'च्या नव्या पुस्तकाचा घाट घातला होता. मी साक्षीदार आहे या गोष्टीची. तेव्हा आपण खालच्या मजल्यावर बसलो होतो.'' डोक्यात प्रकाश पडला. अरे, खरंच की! पंचवीसएक वर्षं सहज उलटली असतील. एका नव्या पुस्तकाची योजना आम्ही मांडली होती.

त्या काळात 'राजहंस'मध्ये माझ्या वारंवार फेऱ्या होत असत. दिलीप माजगावकर आणि साऱ्या राजहंस परिवाराशी घसट वाढत होती. मी नाटक-सिनेमामध्ये रमणारा माणूस! मधून-मधून काहीबाही, बारीकसारीक लिहिणारा, 'किस्त्रीम'चे संपादक श्री. भा. महाबळ यांनी सलग पाच वर्षं निळू फुले, विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर, मोहन जोशी आणि 'एक होता विदूषक' या चित्रपटाच्या निमित्तानं दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल आणि शूटिंगचे दिवस असे मुलाखतवजा लेख दिवाळी अंकासाठी लिहून घेतले होते. राजेश दामले हा तरुण तुर्क सहकारी आणि लेखन कार्यकर्ता माझ्याबरोबर सर्व ठिकाणी बरोबरीने होता. हा सारा लेखनप्रपंच सतत नवीन लेखकांचा शोध घेणाऱ्या आणि त्यांना लिहितं करणाऱ्या दिलीप माजगावकरांच्या वाचनात आला असावा. 'नाट्य-चित्रपटसृष्टीत यांच्या अभिनयक्षेत्रातील लोकांबरोबर बऱ्यापैकी ओळखी आहेत. त्यांच्याशी संवाद साधण्याची कला आहे. प्रयत्न केला तर लिहू शकतील', असे सर्व अंदाज बांधून त्यांनी मला 'लिहा आणि मला आणून दाखवा'

असा प्रस्ताव मांडला. माझ्या आरंभशूर स्वभावाला अनुसरून ‘हो! हो! करू या की!’ असा होकारही दिला. पुढील पाच-सहा दिवस विचार करण्यात गेले आणि एके दिवशी कल्पना सुचली. नटवर्य चंद्रकांत गोखले आणि त्यांचा सारा परिवार माझ्या चांगल्याच परिचयाचा. त्यांचं माझ्या घरी आणि माझं पौड रस्त्यावरील सुधेन्दु सोसायटीमधल्या त्यांच्या घरी येणं नित्याचंच. त्यांच्या मातोश्री कमलाबाई आणि मुलगा विक्रम यांचा आणि माझाही उत्तम परिचय. हे गोखले कुटुंबच कलाक्षेत्रात नाव कमावलेलं. कमलाबाई, चंद्रकांत आणि विक्रम या तीन पिढ्यांचा कलाप्रवास एकाच पुस्तकात मांडला, तर एक ऐतिहासिक दस्तऐवज होईल. शंभर वर्षांचा नाट्य-चित्रपटांचा प्रवाही प्रवास. प्रत्यक्ष त्या प्रवाहातून प्रवास केलेल्या कलाकारांकडून उलगडला गेला, तर कला-वाङ्मय क्षेत्रात माझ्या हातून उत्तम आणि भरीव कामगिरी होईल. माजगावकरांबरोबर झालेल्या पुढल्या भेटीत मी ही कल्पना मांडली आणि माजगावकरांना ती मान्य झाली. ‘पण हे तिघं लिहू शकतील का, ते मान्यता देतील का, याचा अंदाज घ्या आणि त्यांचा होकार असेल तर कामाला सुरुवात करा.’ मी या तिघांशीही चर्चा केली आणि होकार मिळवले. कमलाबाई आणि चंद्रकांत म्हणाले, ‘‘आम्हांला लिहिणं जमणार नाही. आम्ही आठवणी सांगतो. तुम्ही लिहून घ्या.’’ विक्रम गोखले म्हणाले, ‘‘मी जसा वेळ मिळेल तसं लिहून देतो आणि काही भाग प्रत्यक्ष बोलू.’’ चला, या तिन्ही कलाकारांची संमती तर मिळाली. झालेली सर्व प्रगती मी एके संध्याकाळी ‘दर्शन’ हॉटेलमध्ये माजगावकरांना सांगितली. त्या वेळी माझ्यासमवेत माझी पत्नी संजीवनीही होती. मुखपृष्ठ कसं असावं, छायाचित्रं कोणती असावीत, पुस्तकाचा आकार कसा असावा, तीन वेगवेगळ्या कालखंडांतले हे कलाकार - त्यांना एक सूत्रात कसं कसं बांधायचं, प्रत्येकाची व्यक्तिरेखा स्वतंत्र उमटली पाहिजे, पण त्यातला ओघ कुठेही खंडित होता कामा नये; अशा अनेक प्रश्नांवर साधक-बाधक चर्चा झाली आणि आम्ही उत्साहानं ‘दर्शन’बाहेर आलो.

पुस्तकाच्या संकल्पनेला ‘राजहंस’कडून होकार मिळताच माझ्यासमोर उभा




कॅनव्हासवर शब्दांनी रंगवायला घेतलेली चित्रं पुस्तकाच्या पानांवर रंगांनी लिहिली गेली तर?
- अशक्य असं जे घडतं, ते म्हणजे हे पुस्तक!
ही चित्रंच आहेत. शब्दांनी रंगवलेली...

## बिटविन द लाइन्स

चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

राहिला, आमचा तरुण मित्र कुमार गोखले. उत्तम छायाचित्रकार, सुलेखनकार आणि शुद्धलेखनातला बापमाणूस! गोखले परिवाराचे आणि त्याचेही अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आणि राहायलाही अगदी त्यांच्या शेजारीच. त्यालाही कल्पना अतिशय आवडली. ‘‘रामभाऊ, बेस्टच करू हे पुस्तक आपण!’’ एवढं भरीव आश्वासन मिळाल्यानंतर मी कंबर कसली. एका सकाळी टेपरेकॉर्डर घेऊन चंद्रकांत गोखले यांच्या घरी गेलो आणि आमच्या आठवणींच्या मुलाखतीच्या कार्याचा श्रीगणेशा केला. ‘श्रीगणेशा’ एवढीच अक्षरं शाळेत शिकलेल्या आणि अभिनयाचा प्रचंड अनुभव नि वारसा असलेले चंद्रकांत गोखले आपले अनुभव, कडू-गोड प्रसंग, आत्महत्येचे आलेले विचार, जुनी नाटक कंपनी, ओला पगार, कोरडा पगार, उमेदवारीचे दिवस सगळं सगळं अगदी भरभरून बोलत होते आणि हे सारं ध्वनिमुद्रित करत होते. त्यांच्या मातोश्री कमलाबाई तर ‘बेटे से माँ सवाई!’ तल्लख स्मरणशक्ती, त्यांनी केलेल्या भूमिका, फक्त स्त्रियाच काम करत असलेली नाटक कंपनी, पतीचं (रघुनाथराव गोखले यांचं) अकाली निधन आणि दीर रामभाऊ गोखले यांचं नाट्यगृहातच निधन झालेलं असताना प्रेक्षकांना नाराज करायचं नाही, या भावनेनं दुःख उरात दाबून नाटकाचा प्रयोग पूर्ण करण्याचं धाडस आणि कलेबद्दलची निष्ठा - किती किती आठवणी! भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या १९१३ साली निर्माण झालेल्या ‘भस्मासुर मोहिनी’ या मूकपटात मोहिनीचं काम करणाऱ्या पहिल्या स्त्री कलाकार. त्यांच्या मातोश्री दुर्गाबाईंनी पार्वतीची भूमिका केली होती. अशा प्रकारे माझ्या ध्वनिमुद्रणात अनमोल आठवणींची सातत्यानं भर पडत होती. जवळजवळ सोळा-सतरा कॅसेट तयार झाल्या. त्या आता कागदावर उतरवणं अत्यंत आवश्यक होतं. मोठं चिकाटीचं काम, पण हे काम गोखले परिवाराचे चाहते आणि माझे कवी मित्र सुरेश फाटक यांनी आनंदानं स्वीकारलं आणि महिन्याभरात ते पूर्णही केलं. कामाला निश्चित दिशा मिळत होती. आता विक्रम गोखले यांच्या लिखाणाची प्रतीक्षा होती. ‘भरत नाट्य मंदिरा’त झालेल्या त्यांच्या एका नाट्यप्रयोगानंतर मी त्यांना आवर्जून भेटलो. ‘माझ्या लक्षात आहे. मी

मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती. आग्रही आणि पारदर्शी.
सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

**सय** माझा कलाप्रवास

सई परांजपे



आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

तुला सर्व माहिती लिहून देणार आहे. तसं मी तुला स्टॅम्प पेपरवर लिहून देऊ का?' असा हसत-हसत सवालही केला.

आणि एके दिवशी माझ्या कानावर वार्ता आली, दुसऱ्या एका प्रकाशन संस्थेनं 'विक्रम गोखले' याच विषयावर चरित्रलेखनाचं काम सुरू केलं आहे आणि विक्रम गोखले यांनी त्याला मान्यताही दिली आहे. मी ही कटु वार्ता माजगावकरांच्या कानी घातली आणि माजगावकरांनी आपली स्पष्ट नाराजी मला ऐकवली. 'असं नाही करता येणार. कारण एका मोठ्या कलाकार-कुटुंबाच्या तीन पिढ्यांचा इतिहास एका पुस्तकातून मांडला जात असताना त्यातल्याच एका पिढीची कला-कारकीर्द त्याच वेळी दुसऱ्या पुस्तकात येणं योग्य नाही. प्रकाशकाच्या एथिक्सला ते धरून नाही. एकाच वेळेला आपलं पुस्तक आणि दुसऱ्या प्रकाशकांनी प्रकाशित केलेलं पुस्तक बाजारात विक्रीसाठी येणं अयोग्य आहे. तुम्ही काम थांबवा!' पाण्यात ढेकूळ विरघळावं, तसा मी 'राजहंस'च्या कार्यालयातून बाहेर पडलो. आम्ही संकल्पना केलेल्या पुस्तकातून माझं मन त्या क्षणी उडालं ते उडालंच.

काही दिवसांनंतर आम्ही केलेल्या लिखाणाची फाईल आणि ध्वनिफिती दुसऱ्या एका प्रकाशकानं माझ्याकडून नेल्या आणि त्या परत केल्याच नाहीत. हा सारा कटु इतिहास सांगत सुटलो, तर एक भलामोठा इतिहासच होईल. शिवाय आज त्या व्यक्ती हयात नाहीत, तेव्हा त्यांच्या माघारी मी त्यांच्याविषयी लिहिणं हे सभ्यतेला धरून नाही. काही वर्षांनंतर विक्रम गोखले आम्हाला स्वरूप हॉटेलमध्ये भेटले. माजगावकर, विक्रम गोखले आणि मी यांच्यात बोलणंही झालं. पूर्वीचा सर्व अनुभव विसरून जाऊन नव्यानं आत्मचरित्र लिहिण्याचं विक्रम गोखले यांनी मान्यही केलं. जसं लिहून होईल, तसं आपल्याकडे पाठवत जाईन हेही सांगितलं; पण पुढे काहीही झालं नाही. दुसरे प्रकाशक विक्रम गोखले यांचं जे आत्मचरित्र प्रसिद्ध करणार होते, ते प्रकाशित झालं नाही. विक्रम गोखलेंनीही पुन्हा राजहंसनं केलेली लिखाणाची मागणी पूर्ण केली नाही आणि आम्ही हाती घेतलेल्या, घाट घातलेल्या पुस्तकाचा 'घट'च फुटला.

काही वर्षांनंतर नटवर्य चंद्रकांत गोखले यांची दूरदर्शनच्या 'सह्याद्री वाहिनी'वर मुलाखत घेण्याची संधी मला मिळाली. ती मुलाखत प्रचंड लोकप्रिय झाली. आजही ती इतर माध्यमांतून प्रसारित होत आहे.

आज या जगात कमलाबाई, चंद्रकांत आणि विक्रम नाहीत. कुमार गोखलेही अचानक निघून गेला. उरल्या आहेत त्या असफल पुस्तकाच्या कडू आठवणी.

'दर्शन'मध्ये गेल्यानंतर या साऱ्या आठवणी पुन्हा जाग्या केल्या. जखमेवरची खपली पुन्हा एकदा निघाली. रक्त भळाभळा वाहू लागलं. एका नवोदित लेखकाच्या पुस्तकाचा, एका अतिशय महत्त्वपूर्ण दस्तऐवजाचा जन्माआधीच मृत्यू झाला. कालाय तस्मै नम:।।

***श्रीराम रानडे,*** ९८२३१४४७०९

# क...
# कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## ‘माझे-माझे’चे गाठोडे

‘माझे-माझे’चे गाठोडे
तुझ्या चरणाशी वाहिले
तुझे तुझे म्हणताना
किती मोकळी मी झाले ॥

माझे माझे गणगोत
चिंता सर्वांची वाहिली
तुझे तुझे म्हणताना
गुंतागुंत ती सुटली ॥

माझा माझा रे संसार
करिता आयुष्य हे गेले
तुझे तुझे म्हणताना
मुक्त मनोमनी झाले ॥

माझी माझी मुलेबाळे
मोह सुटता सुटेना
तुझे तुझे म्हणताना
चिंता काहीच वाटेना ॥

माझे माझे हे वैभव
हाच ध्यास जीवनात
तुझे तुझे म्हणताना
मन झाले हे निवांत ॥

माझे माझे हे चातुर्य
करी सदा रे विवाद
तुझे तुझे म्हणताना
ऐकू येई अंतर्नाद ॥

माझे माझे म्हणताना
मोह माया ताप जाळी
तुझे तुझे म्हणताना
लागे ब्रह्मानंदी टाळी ॥

माझे माझे मीपण
तुझ्या चरणी वाहिले
तुझे तुझे म्हणताना
तुझ्यातच विलोपले ॥

***अर्चना भालेराव***

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेले 'राजहंसी' काव्यसंग्रह



निवडुंगातून फूल यावे, तसे कवीच्या
काटेरी अनुभवाला आलेले करुणेचे फूल
या कवितांना साद घालते.
कवीची भाषा करुणेचा स्वर लाभलेली
सत्याची भाषा आहे.

### व्याकुळ पिंपळ

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)



हिमांशु कुलकर्णी यांच्या कवितेचा प्रकृतिधर्मच
असा आहे की, स्वत:शीच हळुवारपणे
गुणगुणल्यासारखीच ती व्यक्त होते.
या प्रकृतिधर्माशी सुसंगत अशी सूचकता
त्यांच्या कवितेत अगदी स्वाभाविकपणे आली आहे.
**- मंगेश पाडगावकर**

### दंवभिजली वही

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)



अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य यांत
पिचत असलेल्या समाजाच्या
प्रगतीसाठी उमटलेला संवेदनशील सूर.

### अजान आणि चालिसा

मुबारक शेख

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

### युद्धानंतर...

*आदित्यच्या कविता वाचताना जगात संवेदना आहे,
याचा दिलासा मिळत जातो. आदित्यचेच आयुष्य अजून पुढे आहे.
त्याच्या कवितेत शाळेतील मुलगा कागदावर पसरलेल्या लाल रंगाचे वर्णन
'आमच्या घरातील पांढरी फरशी' असे करतो.*

आदित्य दवणे हा ३१ वर्षांचा तरणाबांड कवी आहे. तो काव्य, ललित लेख गेली दहा वर्षे लिहितो; कविता वाचतो-भाषणे देतो; एकटाच देशभर कोठे-कोठे दूर रानांत, गावाशहरांत मानवी संस्कृतीच्या खुणा शोधत भटकतो; कधी-कधी कोणत्या कॉलेजमध्ये शिकवतो; कधी सोशल मीडियासाठी कार्यक्रम करून पैसे कमावतो-खर्च करतो. मला तो आजच्या मनमुक्त तरुणांचा प्रतिनिधी वाटे. पण महिन्यापूर्वी त्याचा 'युद्धानंतर...' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला आणि मला कळून चुकली त्या तरुणाच्या मनातील अस्वस्थता. अस्वस्थता कसली, अत्यवस्थताच ती!

शीतयुद्ध संपले, तोच काळ जगभर प्रगतीचा-उत्कर्षाचा जाणवू लागला. रशिया आणि अमेरिका यांच्यातील चुरस संपल्याचा आनंद सगळ्या जगाला झाला. परंतु वास्तवात त्या दोन गटांचे बंध सुटले, उदारीकरण आले, वैचारिक-नैतिक अधिष्ठान संपले आणि सगळीच राष्ट्रे जुन्या जखमा चिघळवू लागली, आपापली शस्त्रे परजू लागली. अतिरेकी बळावले, राष्ट्रपुरुषही पिसाळले. त्याहून वाईट गोष्ट म्हणजे, त्या त्या देशांतील बुद्धिवंत, प्रतिभावंत, विचारवंत त्यांच्या त्यांच्या संवेदना हरवून बसले. 'युद्धविरोध', 'शांतता' या गोष्टी लोक विसरूनच गेले!

शीतयुद्धाच्या काळात कवी कविता लिहीत, विचारवंत विवेचन करत, दिग्दर्शकांचे विशेषत: लॅटिन अमेरिकेतील देशांची पार्श्वभूमी असलेले चित्रपट भेदरून टाकत. वास्तवात रशिया-युक्रेन, इस्रायल-हमास, चीनचा भारतातील व पॅसिफिक महासागरातील विस्तारवाद, उत्तर कोरियाची अण्वस्त्र धमकी, इराण-अफगाणिस्तान यांचा अतिरेक आणि भारतासह दक्षिण आशियातील लोकसंख्येचा स्फोट व 'विकासा'चा हव्यास... 'सबका साथ' केव्हाच मागे पडला. आदित्यने

विपुलतेच्या, ऐश्वर्याच्या, सुखासीनतेच्या, शांत भासमान जगाला जबरदस्त तडाखा हाणला आहे. ज्येष्ठ कवयित्री नीरजा हिने त्याच्या कविता जाणल्या, स्पष्टीकरणे शोधली, कविता कुशल संपादकाच्या हाताने मांडून दिल्या. तर मी संग्रह वाचताना 'जंतुराज'ने. 'जंतुराज'मधील ओळ पाहा - 'मग पृथ्वीवर उरेल शांतता आणि मृत झुरळांचे डोंगर - इतस्तत:!' पण केवळ या दोन कवितांचा उल्लेख केला. काही शीर्षकेच पाहा - कँडल मार्च, स्थलांतर, पीस ट्रीटी, चेर्नोबिल, क्षेपणास्त्र, व्हाइट हेल्मेट्स, होलोकॉस्ट, लिंचिंग...

***दिनकर गांगल***

(*'लोकमत'* मुंबई, अक्षररंग, रविवार, २८ जुलै २०२४मधून साभार)

'माणसाला शत्रुत्वाने नव्हे, तर प्रेमाने जिंकता येते'
हा मंत्र येशू जगला. येशूचे बोट धरून
आयुष्यभर वाटचाल केलेल्या साधकाने
प्रासादिक भाषेत लिहिलेले लालित्यपूर्ण ख्रिस्तचरित्र.



अनाहत ख्रिस्त

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

पोप दुसरे जॉन पॉल यांचे आयुष्य म्हणजे
असंख्य नाट्यपूर्ण घटनांची मालिकाच!
या कॅथलिक धर्माचार्यांच्या पोलंडमधील पूर्वायुष्यासह
व्हॅटिकनमधील प्रदीर्घ प्रवाही कारकिर्दीचा
फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी घेतलेला
सविस्तर आढावा.




पोप दुसरे जॉन पॉल
जीवनगाथा

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

। श्रद्धांजली ।

*फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे दि. २५ जुलै, २०२४ रोजी दु:खद निधन झाले. 'राजहंस प्रकाशन' परिवारातर्फे फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना आदरांजली!*
*फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांची 'सुबोध बायबल', 'पोप दुसरे जॉन पॉल', 'नाही मी एकला', 'सृजनाचा मळा', 'अनाहत ख्रिस्त' इ. पुस्तके राजहंसने प्रकाशित केली आहेत.*
*'राजहंस'चे ज्येष्ठ संपादक आनंद हर्डीकर यांनी २८ जुलै २०२४ रोजी 'लोकसत्ता' या दैनिकात त्यांच्यावर लेख लिहिला होता. फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना श्रद्धांजली म्हणून तो लेख पुन:प्रकाशित करत आहोत.*

## सांस्कृतिक सेतुबंधनाचे स्वप्न पाहणारे फादर


फादर फ्रान्सिस दिब्रिटो

ही बातमी ऐकल्यापासून गेल्या २०-२२ वर्षांमधले त्यांच्याबरोबरच्या संबंधांतले असंख्य प्रसंग डोळ्यांसमोरून तरळून गेले. खेळीमेळीतल्या चर्चेपासून धर्मतत्त्वांच्या व्यावहारिक आविष्काराबद्दलच्या खडाजंगीपर्यंतचे बरेचसे चढउतारही आठवले, पण जास्त प्रकर्षाने आठवत राहिले, ते परदेशांतल्या वास्तव्यात त्यांना वारंवार विचारल्या गेलेल्या प्रश्नाचे त्यांनी दिलेले उत्तर.

'पाक्स ख्रिस्ती इंटरनॅशनल' या संस्थेने आयोजित केलेल्या एका परिषदेसाठी फादर दिब्रिटो युरोपमध्ये ब्रूसेल्स, रोम वगैरे बऱ्याच ठिकाणी गेले होते. तिथे राहत असताना अनेकदा त्यांना प्रश्न विचारला जात असे, ''पुनर्जन्मावर तुमचा विश्वास आहे का?''

ते उत्तर देत असत, ''ख्रिस्ती तत्त्वज्ञानानुसार पुनर्जन्म नाही.''

फादरच्या या उत्तराने त्या प्रश्नकर्त्याचे समाधान होत नसे. त्यांचा दुसरा प्रश्न तयार असायचा, ''पण समजा, पुनर्जन्म असलाच, तर तुम्हाला कुठे जन्म घ्यायला आवडेल? युरोपमध्ये की अमेरिकेत?''

दिब्रिटो उत्तर देत, ''पुनर्जन्म असेलच आणि तो कुठे घ्यायचा, हे

निवडण्याचं स्वातंत्र्य असेल; तर मी देवाला सांगेन, की मला पुन्हा भारतातच आणि तेही एखाद्या मराठी कुटुंबात जन्माला घाल!'' श्रोत्यांना आश्चर्याचा धक्का बसत असे.

ही प्रश्नोत्तरे मला फादर दिब्रिटोंच्या व्यक्तिमत्त्वात वसणाऱ्या विरोधाभासाचे प्रतीक वाटतात. एकीकडे हाडीमाशी खिळलेली ख्रिस्ती धर्मनिष्ठा आणि दुसरीकडे धमन्यांमधून वाहणारे मायमराठीतल्या संतसाहित्यावरचे प्रेम यांमध्ये त्यांचे मन आणि लेखनही झोके घेत असे. कधी कधी ते दोन ऊर्जाप्रवाह त्यांना भिन्न भिन्न दिशांना खेचू पाहत आहेत, असेही माझ्यासारख्या निरीक्षकाला जाणवत असे. आणि त्याच वेळी जाणवत असे, ती त्यांच्या मनातली सांस्कृतिक सेतुबंध उभारण्याबद्दलची खरीखुरी कळकळ. तशा सेतुबंधनाच्या कार्यात त्यांना मिळालेल्या यशापयशाचा लेखाजोखा मांडला जाणार असेल, तेव्हा मांडला जावो, पण आज मात्र हा माझा मित्र 'ओॲसिसच्या शोधात' दूरवरच्या प्रवासाला निघून गेला आहे. त्या न परतीच्या वाटेवर 'नाही मी एकला' असा निरोप त्याने मागे ठेवला असला, तरीही कुठे तरी अंत:करणात जीवघेणी कळ उठतेच आहे.

सुमारे वीस वर्षांपूर्वी दिब्रिटोंशी माझी पहिली प्रत्यक्ष भेट 'राजहंस प्रकाशना'च्या मुंबईतल्या कार्यालयात झाली. 'संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची' हे त्यांचे आगामी पुस्तक संपादकीय नजरेने वाचून मी काही प्रश्नांची/शंकांची पानवार यादी तयार करून ठेवली होती. ती त्यांच्यासमोर ठेवल्यावर प्रथम त्यांना माझ्या म्हणण्यावर विश्वास ठेवावा, असे वाटले नाही; त्यांनी तिथल्या तिथे त्यांच्या दोन परिचित मान्यवरांना फोन केला आणि माझ्या शंकांबद्दल त्यांना विचारून खातरजमा करून घेतली - 'फादर, तुमची संहिता मी वरवर वाचली आहे, चाळली आहे इतकेच. ती शब्दश: वाचून हर्डीकरांनी ज्या सुधारणा सुचवल्या आहेत, त्या बरोबरच आहेत.' असे दोघा मित्रांकडून त्यांना सांगितले गेले. मग मात्र त्यांनी माझ्यावर पूर्ण विश्वास टाकला आणि त्यांच्या-माझ्यात मनमोकळी चर्चा सुरू झाली, ती पुढे कायम होतच राहिली.

पॅलेस्टाइनमधल्या सध्याच्या संघर्षाची मुळे ब्रिटिश वसाहतवाद्यांच्या कटकारस्थानांमध्ये सापडतात, यासारख्या मुद्द्यांवर आमचे एकमत झाले, की त्यांच्या लक्षात येई की, १९७३मधल्या 'योम किप्पूर' युद्धानंतर लगेच माझे 'अंतहीन संघर्ष' हे अरब-इस्त्राइल संघर्षाच्या प्रदीर्घ इतिहासावरचे पुस्तक प्रसिद्ध झाले होते आणि त्यानंतरही मी त्या समस्येचा अभ्यास सुरूच ठेवलेला आहे. शिवाय मी माझ्याजवळची माहिती त्यांचे पुस्तक अधिकाधिक चांगले व्हावे, आशयसमृद्ध व्हावे, याच हेतूने त्यांना पुरवतो आहे. मग आमच्या

दोघांभोवती मैत्रीचा धागा विणला जाई. लेखक-संपादक या औपचारिक नात्यापलीकडचे भावबंध जुळले जात.

ते वसईतल्या एका छोट्याशा खेडेगावातल्या सामान्य कुटुंबात जन्मले असले, तरी मराठी माध्यमाच्या शाळेतच शिकले आहेत. ख्रिस्ती धर्मोपदेशक म्हणून जसा मी त्यांना ओळखत होतो, तसाच 'सुवार्ता' या मासिकाचे संपादक म्हणूनही ओळखत होतो. त्या ख्रिस्ती नियतकालिकाचे अंतरंग व्यापक व्हावे म्हणून ख्रिसमस विशेषांकाप्रमाणेच ते दिवाळी विशेषांकही काढतात, मराठी साहित्यिकांचे साहित्य त्यात आवर्जून छापतात, हेही मला ठाऊक होते. गोरेगाव, पुणे, रोम वगैरे ठिकाणच्या ख्रिस्ती शिक्षण संस्थांमधील दहा वर्षांचा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून परतलेल्या दिब्रिटोंच्या विविध उपक्रमांमध्ये ख्रिस्ती धर्मप्रसाराचा अंतस्थ हेतू असतो, ही टीकाही माझ्या वाचनात होती. एवढेच नव्हे, तर मे. पुं. रेगे यांच्यासारख्या तत्त्वज्ञ विचारवंतांनी ही अपरिहार्यता जाणवली म्हणून 'नवभारत' या त्यांच्याच संपादकत्वाखाली निघणाऱ्या नियतकालिकामध्ये प्रदीर्घ लेख लिहून 'दिब्रिटो यांच्या लेखनातून कालकूट (विष) पाझरत आहे', अशा शब्दांत केलेला तर्कशुद्ध प्रतिवादही मी बारकाईने अभ्यासला होता.

उलटसुलट प्रतिक्रियांच्या अशा जंजाळात न अडकता दिब्रिटोंबद्दलचे स्वतंत्र आकलन केले पाहिजे; त्यांच्या लालित्यपूर्ण शैलीचे सौंदर्य आणि मराठी संतसाहित्यावरचे त्यांचे निरतिशय प्रभुत्व यांना दादही दिली पाहिजे, त्यांच्याबद्दलचा समतोल दृष्टिकोन बाळगला पाहिजे, अशा निष्कर्षाप्रत मी आलो आणि योगायोगाने त्यांच्या दोन पुस्तकांच्या संपादनाची लागोपाठ संधी मिळाल्यामुळे मला तशी तोलाई शक्यही झाली.

'पोप दुसरे जॉन पॉल' यांचे चरित्र आणि 'सुबोध बायबल' हा त्या ग्रंथाचा भावानुवाद अशी दिब्रिटोलिखित दोन पुस्तके 'राजहंस'तर्फे मी संपादित केली. आमच्या संपादकीय विभागातली वैचारिक स्वायत्तता पुरेपूर उपभोगत मी त्या दोन्ही पुस्तकांच्या निमित्ताने दिब्रिटोंशी खूप चर्चा केली. चर्चेच्या विविध प्रश्नांवरील भूमिकांबद्दलचे प्रश्न-उपप्रश्न विचारून त्यांना भंडावून सोडले; त्यांच्या वक्तव्यांमधील दुटप्पीपणाची अनेक उदाहरणे पुराव्यांसह त्यांच्यासमोर मांडली; तर्कशुद्ध प्रतिवाद केला.

'मूर्तिपूजा म्हणजे व्यभिचार आहे, तो गुन्हा करणाऱ्यांना त्यांच्या बालबच्च्यांसह धोंडमार करून (लिंचिंग) ठार मारा' असा सुस्पष्ट आदेश देणारा मोझेस 'राष्ट्रपुरुष' म्हणून तुम्ही गौरवू शकता तरी कसे?', 'पोलंडपासून सोव्हिएत युनियन - साम्यवादी चीनपर्यंत विविध देशांत कॅथलिक चर्चने हस्तक्षेप केला,

त्या देशांमधील बंडखोरांना छुपी मदत दिली, तर ती तुम्हाला आक्षेपार्ह वाटत नाही, पण या भारतात मात्र धर्मसंस्थेने राजकारणात हस्तक्षेप करू नये, अशी प्रवचने तुम्ही देत सुटता. हा दुटप्पीपणा तुम्ही कसा काय समर्थनीय मानता?' हे आणि असे इतरही अनेक प्रश्न मी दिब्रिटोंना समोरासमोर विचारले. त्यांनी कधीही त्याबद्दल माझ्याजवळ नाराजी व्यक्त केली नाही किंवा दिलीपराव माजगावकरांकडे तक्रारही केली नाही.

माझ्या अशा प्रश्नांचा त्यांच्यावर निश्चित परिणाम झाला असावा. त्यांनी माझ्याबरोबरच्या चर्चेत या प्रश्नांना उत्तरे देऊन मला गप्प बसवण्याचा प्रयत्न केला नाही, तरी त्यांनी त्या प्रश्नांची दखल घेऊन लेखनात काही सौम्य बदल केले. काही ठिकाणी चर्चकडून झालेल्या अन्यायाची आणि गफलतींची कबुलीही दिली. पण त्यांच्या तशा लेखनावर चर्चच्या यंत्रणेची असणारी पकड इतकी जबरदस्त होती, की ते माझ्या अपेक्षेइतकी बंडखोरी करू शकले नाहीत. मात्र 'मोझेस ते येशू हा जुन्या करारापासून नव्या करारापर्यंतचा प्रवास म्हणजे असहिष्णुतेकडून सहिष्णुतेकडे झालेला प्रवास आहे,' अशी आपल्या विवेचनाची पुनर्मांडणी त्यांनी केली. शिवाय आपल्या सहिष्णू अध्ययनशीलतेचा उत्कट आविष्कार घडवीत दिब्रिटोंनी मी सुचवत गेलो, त्या त्या संज्ञांबद्दलच्या किंवा संकल्पनांबद्दलच्या अभ्यासपूर्ण टिपा लिहिल्या. थोड्याथोडक्या नाहीत, तब्बल १९०६!

माझ्यासारखा एक हिंदुत्ववादी संपादक (फादरच्या भाषेत संघाशी नाळ जुळलेला) आणि दिब्रिटोंसारखा एक कर्मठ ख्रिस्ती साहित्यिक यांनी एकत्र येऊन सुबोध बायबलचा प्रकल्प पूर्ण केला आणि तो सचित्र महाग्रंथ फादरच्या अपेक्षांपेक्षाही जास्त गाजला. आमच्या उभयतांच्या भावजीवनातला तो एक उत्कर्षबिंदू म्हणजे दिलीपराव माजगावकरांना आणि फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनाही अपेक्षित असणारा सांस्कृतिक सेतुबंधनाचाच एक प्रयोग होता.

तशा सांस्कृतिक सेतुबंधनाचे एक स्वप्न दिब्रिटोंनी माझ्याजवळ एकदा बोलून दाखवले होते. 'स्नेहसदन'मधून निघून गायकवाड वाड्यावरून नागनाथ पाराजवळच्या 'राजहंस' कार्यालयाकडे जाताना त्यांनी मला ग. त्र्यं. माडखोलकरांच्या- पत्रकारितेतल्या त्यांच्या गुरूच्या- 'एकला' या कादंबरीत दिब्रिटोंचे पात्र कसे रंगवले आहे, हे सांगितले होते. माडखोलकर त्यासाठी 'स्नेहसदन'मध्ये गेले होते, तेथील भोजनापूर्वीचा 'सहनाववतु' हा मंत्र म्हणण्याचा प्रसंग त्यांनी अनुभवला होता आणि मग लिहिला होता. ही माहितीही पुरवली होती आणि नंतर म्हणाले होते, ''पुण्यातल्या कँपमध्ये इंग्रजीभाषक ख्रिस्ती लोकांची मोठी वस्ती आहे. त्यांचा अन्य मराठीभाषक ख्रिस्ती समाजाशीही

फारसा संपर्क नाही. सदाशिव-शनिवार पेठांतील लोकांनाही त्यांच्याशी सोयरसुतक वाटत नाही. ही बाब हितावह नाही. ज्या दिवशी लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी पुण्याच्या पेपल सेमिनरीमध्ये साजरी होईल आणि रेव्हरंड ना. वा. टिळकांची जयंती केसरीवाड्यात साजरी होईल, तेव्हा खरे भारतीय मनोमीलनाचे स्वप्न साकार होईल!''

फादर दिब्रिटोंच्या निधनाची बातमी ऐकून मला आमचे दोघांचे हे संभाषणही आठवले आणि वाटले, की त्यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी तरी त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे मराठी कुटुंबातच पुनर्जन्म लाभावा!

***आनंद हर्डीकर***




अनेकानेक निसर्गचित्रे रेखाटणारी
प्रसन्न शैलीतील ही आस्वादक गद्यकाव्ये!
हळव्या कविहृदयाच्या धर्मोपदेशकाने
रचलेली भावकविता म्हणजे...

**सृजनाचा मळा**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

पिढ्यान् पिढ्यांचा 'भावरताचा वारसा
जपणारे स्फटिकासारखे स्वच्छ,
पाण्यासारखे प्रवाही,
निसर्गासारखे निर्मळ आत्मकथन.

**नाही मी एकला**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३३०/- । (ट.ख. ₹ ५०)



**विज्ञानाबद्दल कुतूहल असणाऱ्या, तसेच रहस्य आणि गूढतेविषयी आकर्षण असणाऱ्या रसिक वाचकांसाठी तीन कादंबऱ्या...**



नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि त्याविषयीच्या आख्यायिका...
एकामागोमाग एक घडणाऱ्या रहस्यमय घटना...
धनेश त्याच्या गुप्त 'मिशन'मध्ये यशस्वी होणार का?

## द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)



१६९५मध्ये औरंगजेबाच्या एका जहाजावर पडलेल्या दरोड्याचा शोध घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग केला जातो. ही सांगड घालताना निर्माण होणारे प्रश्न आणि निघणारे निष्कर्ष खरे असतील का? किंवा खरेच निघाले तर...?

## १६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!

सुरेश वांदिले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)



पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा... वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग... आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.

## सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

### मेड इन चायना : लोकार्पण सोहळा



डावीकडून : पिनाक दंदे, मा. नितीन गडकरी, गिरीश कुबेर,
एअर मार्शल एस. बी. देव आणि नरेश सबजीवाले

अभिनंदन!

राजयुवा प्रतिष्ठान
(महाराष्ट्र राज्य व राजयुवा प्रकाशन, पुणे)



सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह
२०२४

**आतून उगवलेल्या कविता**

◆

प्रा. प्र. द. कुलकर्णी



## 'राजहंसी' विविधा




बेर्डेमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी.
कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

### हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

### सीता

अभिराम भडकमकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३७५/- । (ट. ख. ₹ ५०)







त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले... सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले...
असा हा मुलखावेगळा कार्व्हर
या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

### किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## किमयागार कार्व्हर



प्रति,
माननीय वीणाताई गवाणकर यांस स. नमस्कार
प्रिय वीणाताई,

आपण लिहीलेले किमयागार कार्व्हर हे पुस्तक बाबांनी आम्हाला वाचून दाखविले किमयागार कार्व्हर हे पुस्तक ऐकल्यानं-तर मला खूप काही शिकायला मिळाले.

मिळालेला वेळ वाया घालवायचा नसतो हे मला जॉर्जकडून शिकायला मिळाल. शेंगदाणा आणि रताळा यांपासू-न एवढे पदार्थ बनतात हे तर मला माहितच नव्हत. जॉर्ज अनाथ होता तरीही तो एकटा शिकला त्याचं मला खूप कौतुक वाटत. आपले आई-बाबा बाहेर गेले की आपल्याला त्यांची आठवण येते करमत नाही जॉर्जला तर दोघं नव्हते त्याला कस वाटत असेल? अमेरिकेमध्ये काळा गोरा भेदभाव होता जॉर्ज काळा होता म्हणून त्याला ॲडमीशन मिळत नव्हत म्हणून जॉर्ज काळ्या मुलांच्या शाळेत जाऊन शिकला आणि जगप्रसिद्धशास्त्रज्ञ बनला.

अशा या जॉर्जबद्दल तुम्ही पुस्तकामध्ये खूप छान प्रकारे मांडलेल आहे आणि माधुरीपुरंदरेताईंनी काढलेली चित्रसुद्धा मला खूप आवडली.

आमच्यासाठी अशीच पुस्तके लिहीत जा..

कु. कार्तिकी विराज घरत
इयत्ता ३री

## ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

'ज्याचं त्याचं एव्हरेस्ट' ही मृणालिनी चितळे यांची एकदम जमलेली कलाकृती आहे. सर्व व्यक्तिरेखा, बदलत्या काळानुसार, परिस्थितीनुसार त्यांच्यात झालेले बदल सूक्ष्मपणे टिपले आहेत. एव्हरेस्टच्या मोहिमेतील अनेक बारकावे, निसर्गाची बदलती रूपे खूप अभ्यास करून मांडलेली जाणवतात. त्या काळातील राजकीय, सामाजिक परिस्थिती, त्यातून घडलेली मानसिकता यांचे अप्रतिम चित्रण... इतिहासाचे दाखले... शेर्पांचे खडतर आयुष्य... एवढा मोठा कॅनव्हास हाताळणे हे खूप ताकदीने केले आहे. पुढील लेखनासाठी खूप शुभेच्छा...!

***डॉ. सुचित्रा कुलकर्णी***

## ओंजळीतील चाफा

आपले 'ओंजळीतील चाफा' हे लेखसंग्रहाचे पुस्तक म्हणजे आपल्या जगण्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा आरसा आहेच, पण मूल्यांच्या पडझडीचा आपल्या नजरेस आलेला काळ वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा एक चांगला प्रयत्न आहे.

पुस्तकातील चिंतन प्रातिनिधिक असले, तरी त्याला सर्वस्पर्शी गंध आहे. हे लेखांचे वैशिष्ट्य आहे; असे मला वाटते.

आपणच आपल्याला पिंजऱ्यात उभे करून असे चिंतन करावे लागते. ते आपण अतिशय समर्पक शब्दांत व्यक्त करण्यात यशस्वी झाला आहात, असे मला हे वाचताना जाणवत राहिले.





हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे,
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या
पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

**ओंजळीतील चाफा**

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

आपल्या काही लेखांतून भवताल येतो. या भवतालाला घेरलेल्या अनेक गोष्टी येतात आणि हाच भवताल आपल्याला गरगरायला लावतो.

आपले लेखन सर्वांना चिंतन करायला लावेल, हेच या लेखनाचे यश आहे!!

***कृष्णात खोत***

## इन्शाअल्लाह

आत्ताच अभिराम भडकमकर लिखित ‘इन्शाअल्लाह’ ही कादंबरी वाचली..

बऱ्याच दिवसांपासून मनात घोळत होते की, ही कादंबरी वाचायची; पण योग येत नव्हता... परवा मॅजेस्टिक पब्लिशिंगमधून हे पुस्तक विकत घेतले आणि वाचायला सुरुवात केली..

मुस्लीम समाजामधील रूढी, परंपरा आणि चालीरिती... बऱ्याचशा अनिष्ट आणि कालबाह्य झालेल्या... त्या कुरवाळत बसून त्यांवर पोळी भाजणारा एक वर्ग (शब्बीर, अश्रफ) आणि समाजामध्ये मिसळून, प्रत्येकाची बाजू ऐकत ती वाट बदलण्याचा प्रयत्न करणारा एक वर्ग (झुल्फी, रफिक) ...आणि या दोघांमध्ये ससेहोलपट झालेली जमिला आणि प्रयत्न करूनही आवाज नसलेला बागी चाचा, आणि या कुठल्याच गोष्टीशी सोयरसुतक नसलेला सुहैल... आत्तापर्यंतच्या काळात votebank म्हणून आपला वापर केला गेला, ही मुस्लीम समाजाला झालेली जाणीव कौतुकास्पद. अनेक राजकीय पक्ष सोयीनुसार भूमिका घेतात, हे हसन या व्यक्तिरेखेतून सुंदर चितारले आहे.

श्री, अनंता, नदिमा या व्यक्तिरेखासुद्धा कुठला ना कुठला परीघ मोडायचा आणि

दारिद्र्यात पिचत असलेली मुस्लीम वस्ती. पैशाचा अभाव. शिक्षणाचा अभाव. एके दिवशी वस्ती ढवळून निघाली. पोरांची धरपकड झाली. त्या शहरातले हिंदू-मुस्लीम नेते, कार्यकर्ते, राजकारणी या सर्वांना चित्रित करत पुढे पुढे जाणारी कादंबरी.

इन्शाअल्लाह

अभिराम भडकमकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट. ख. ₹ ५०)



त्यातून बाहेर पडायचा प्रयत्न करीत असतात.

त्याचबरोबर, हिंदू धर्मात असलेल्या चालीरिती, ज्या नवीन पिढीला थोतांड वाटतात, त्यावरही हे पुस्तक प्रकाश टाकते. माथेभडकावू प्रवृत्ती दोन्ही समाजांत आहेत आणि योग्य वेळी सारासार विवेकबुद्धी गहाण ठेवली जाते, हेही आपण इथे दाखवून दिले आहे.

'परिवर्तन हा सुधारणेचा पाया आहे.' असे एक वाक्य आपल्या पुस्तकात आहे, पण हे होण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहेत; कारण अजूनही आपल्याकडे निवडणुका धर्मावर आधारित लढल्या जातात. पण पुस्तकाचा शेवट हा आशावादावर आधारित आहे, जो एक मार्ग आपल्याला दाखवतो. शिक्षणाशिवाय मुस्लीम समाजाची उन्नती होणार नाही, सर्वांगीण विकास होणार नाही; हा मुद्दा ठामपणे अधोरेखित केला जातो.

बदल हा स्थायिभाव आहे, पण तो करण्यासाठी कोणाला तरी रक्त वाहावे लागते आणि यातूनच नवी ठिणगी जन्माला येते; याचे चित्रण सुयोग्य पद्धतीने केले आहे.

डोक्याला झिणझिण्या आणणाऱ्या आणि वेगळ्या प्रकारे विचारासाठी प्रवृत्त करणाऱ्या या पुस्तकाबद्दल धन्यवाद.

***मिलिंद जोशी*** , ९८१९०२२९३२

## मिरॅकल

'मिरॅकल' हे डॉ. सुनिल विभुते सरांनी लिहिलेले सुंदर पुस्तक मी वाचले आणि काही-काही प्रसंगांमध्ये अगदी रममाण होऊन गेले. पुस्तक वाचताना त्यामधील कथा वाचकाला खिळवून ठेवतात. त्यातील प्रसंग इतके अचूकतेने लिहिले आहेत, की




आजच्या विज्ञानाच्या पायावर भविष्यातील
विज्ञानकल्पनेचा महाल उभारणाऱ्या -
मानवी भावभावनांचा, परस्परसंबंधांचा
वेध घेणाऱ्या - उत्कंठावर्धक, चित्तथरारक अन्
रंजक विज्ञानकथांचं सप्तरंगी इंद्रधनुष्य!

मिरॅकल

डॉ. सुनील विभुते

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

लहान-लहान गोष्टीसुद्धा त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. काश्मीरचे वर्णन असो, की बसचा अपघात. तो झाल्यानंतर त्यामध्ये मरण पावलेल्या पुण्याच्या अपार्टमेंटमधील पुरुषमंडळींच्या सर्व वीरपत्नींचा पतीच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या आतंकवाद्यांना धडा शिकवण्यासाठीचा खडतर पण अभिमानास्पद प्रवास असो, वा सर्वांना दिलेली शिक्षा असो, याचे वर्णन अप्रतिमच.

'राकेस करणी' ही कथा वाचल्यावर मलाही जंगलात जाऊन त्या दुर्मीळ झाडांची फळे पाहायला खरेच आवडेल असे वाटले. ती झाडे आपल्या भारतातल्या जंगलांत आत्ताही असावीत. 'फॉलसोबो' वाचताना डॉ. विभुते सरांची वैज्ञानिक भाषाशैली खूपच छान आहे, हे जाणवले. ही कथा आपण हॉलिवूड चित्रपट पाहत आहोत, अशा सुंदर पद्धतीने रेखाटली आहे. 'कार्डीओ' या कथेतील बापू वाचकांच्या दीर्घकाळ मनावर कोरले जातील इतके डॉ. विभुते सरांचे शब्द ताकदवान आहेत व तेवढेच हळवेदेखील. इन्स्पेक्टर रुद्रप्रताप यांचे वर्णन कडवा पोलीस इन्स्पेक्टर असे केले आहे. त्याची कर्तव्यदक्षता व पराक्रम यांना लेखकाने आपल्या शब्दांतून योग्य न्याय दिलेला दिसून येतो. 'मिरॅकल' कथा वाचून असेही मिरॅकल होऊ शकतात, असेच वाटू लागते. 'गुरुमहाराज' ही कथा संपेपर्यंत हुबेहूब माणसासारखे दिसणारे यंत्रमानव आहेत, हे समजत नाही.

डॉ. विभुते यांची लेखनशैली खूपच वास्तववादी, वाचकाला भुरळ पाडणारी आहे आणि समजायला सोपी अशी आहे. त्यामुळे बऱ्याच दिवसांनी असे पुस्तक मिळाले, की हातातून ठेवावे असे वाटले नाही.

***सुवर्णा कुलकर्णी***, पंढरपूर

### मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी

- युद्धानंतर... — किंमत : ₹ १८०/-
  आदित्य दवणे
- स्फूर्तिवादी नीतिशास्त्र — किंमत : ₹ २७०/-
  राजीव साने
- नवे शैक्षणिक धोरण — किंमत : ₹ २४०/-
  प्रा. डॉ. नितीन करमळकर । मंगला गोडबोले
- नागरिकत्व दुरुस्ती कायदा — किंमत : ₹ २००/-
  शेषराव मोरे

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
ॲन्ड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

‘नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण’
(नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२०)
यंदापासून अमलात येतंय,
अशा वेळी शिक्षणातल्या सगळ्या घटकांना पडणाऱ्या
तब्बल ५५ प्रश्नांची नेमकी उत्तरं देणारं,
शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलेलं मोलाचं पुस्तक.



Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

भारताच्या सहा शेजारी देशांमधील
ठरावीक व्यक्तींना
भारताचे नागरिकत्व
ज्या कायद्याने मिळू शकते,
त्या नव्या कायद्याच्या
विविध पैलूंचा वेध घेणारे -




## नागरिकत्व दुरुस्ती कायदा

शेषराव मोरे

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**